26. **Reaction Time As a Function of Cognitive Style Among Students**

- Dr. Nagorao Palwade ---------- 136

27. **Nutrition Awareness of Rural Pregnant Women as influenced by Nutrition Education Counselling**

- i) Ku. Ranjana R. Jawade, ii) Dr. Nuzhat Sultana M.B. ---------- 139

28. **Significance of Socioeconomic Status on Academic Anxiety of High School Students**

- i) Sheetal Savant, ii) Dr. Rajani Talhar Senad ---------- 145

29. **Conflictive Thoughts As Function of Psycho-Physiological State of Students**

- Prof. Shital Gutte ---------- 149

30. **Depression as an effect of COVID-19 pandemic among Working Women**

- i) Disha Desai, ii) Dr. Mahendra Patil ---------- 153

ISSN No. 2394-5990


31. **Nutrition and Depression among rural school going Adolescents of Sambhajinagar District**

- i) Mrs. Karpe Sanika, ii) Prof. Nuzhat Sultana ---------------------------- 159

32. **Study of Quality Life of Women's**

- i) Sangita K Wadode, ii) Dr. Rajesh B Shirsath ------------------------ 166

33. **A Study of Youth Problems among College going Students**

- Dr. Prabodhan Bhagirath Kalamb ------------------------------------------ 171

34. **Smart Phone Addiction and Dark Personality Triad**

- i) Dr. Shankar D. Wakode, ii) Dr. Pradnya P. Yenkar,
iii) Dr. Gajanan R. Ratnaparkhi -------------------------------------------- 178

35. **Health and Women Empowerment**

- i) Shital Ravindra Thakare, ii) Dr. Vandana Namdeo Bankar ----------- 183

36. **A Comparative Study of Marital Adjustment and Mental Health of Women in Joint Families and Women in Separate Families**

- i) Assi. Prof. Shital Bhagwat Jadhav,
ii) Asso, Prof.Babaso Bhimrao Pawal ------------------------------------------ 186

37. **The Psychology of Food and Eating**

- Dr. Shilpa Deshpande ------------------------------------------------------ 191

38. **The Role of Cognitive Emotions Regulation and Psychological Capital on Work Engagement among Female Teachers**

- i) Patode Hemangi, ii) Prof. Mhaske, R., --------------------------------- 195

39. **A Study of Life Satisfaction among Working and Non-Working women**

- i) Seema Perkar, ii) Dr. A. A. Ashtaputre -------------------------------- 201

40. **Job Satisfaction : Rural Versus Urban Primary Health Care Workers' Perception**

- Dr. Amol Ashok Nare ------------------------------------------------------- 205

41. **To Study the Level of Aggression & Depression among Male & Female What'sapp Users**

- Dr.Kalpana R.Vitore ---------- 208

42. **A Comparative Study of Life Satisfaction level among Urban and Rural women**

- Dr. R.R. Senad ---------- 211

43. **Irrational Beliefs among Adolescents: Exploring Differences in Orphan Status and Gender**

- i) Santosh Janrao, ii) Dr. Gauri Kadam ---------- 216

44. **Role of parent's in managing screen time of children**

- i) Sarika Hiralal Mali, ii) Dr. Shaikh Tahemina Naaz ---------- 222

45. **The Impact of Socioeconomic Conditions on Career Selection Behavior**

- i) Dr. Ramprasad Shivajirao Kale, ii) Dr. Pundalik Vitthal Rasal ------ 226

46. **Social networking addiction among adolescent**

- i) Pramod D. Wagh, ii) Dr. Nagorao Dongre ---------- 231

47. **A Study of Death Anxiety and Depression among College Students**

- i) Ms. Pathade Kalyani Harichandra, ii) Dr. Sunil Jadhav E. ---------- 237

48. **A Study of Fear of Negative Emotions and Depression among Teenagers**

- Dr Arti S. Thale ---------- 242

49. **A study of the consequences of excessive use of mobile phones in Adolescents**

- i) Dr. Ragini Padhye, ii) Dr. Rohini Ankush ---------- 247

50. **A comparative study between Loneliness and Depression among elderly people who live in old age homes and in their homes**

- Srushti Vijaykumar Joshi ---------- 251

▲▲▲

# Smart Phone Addiction and Dark Personality Triad

**i) Dr. Shankar D. Wakode**
Department of Psychology,
Vidya Bharati Mahavidyalaya,
Amravati (M.S.) Mo-9421829222,
email- shankarwakode04@gmail.com

**ii) Dr. Pradnya P. Yenkar**
Principal, Vidya Bharati Mahavidyalaya,
Amravati (M.S.) Mo-9422870879,
email- pradnyayenkar@gmail.com

**iii) Dr. Gajanan R. Ratnaparkhi**
Department of Psychology,
Mahatma Fuley Mahavidyalaya,
Amravati Mo-9850158676
email- gratnaparkhi@gmail.com

**Abstract :**

Use of smart phone is an essential requirement for fast communication, entertainment and a medium of education too. After Covid-19 there is a tremendous growth spurt in the use of smart phone and internet. However, the excessive use of the smart phone gazettes and various apps is leading to adverse effects on teenagers and the youngsters, popularly known as the Gen Z.

The study aimed to explore the role of Smart Phone Addiction in Dark Personality Triad; Narcissism, Sociopath and Machiavellianism in the Gen Z. The sample comprised of 348 (Female- 248 and Male- 100) college students offering different study courses. Smart Phone Addiction Scale by Dr. Vijayshri and Dr. Masaud Ansari (2021) and Dark Personality Triad Scale (Short form) by Jones and Paulhus (2014) were used to measure the prevalence of Narcissism, Psychopathy and Machiavellianism. The responses were sought in the online mode. Correlational design was used. Significant correlation was found between Smart Phone use and Dark Personality Triad (r = .52 **) and Smart Phone use with narcissism (r = .27 **), with Psychopathy (r = .54 **) and with Machiavellianism (r = 0.46 **). For cross verification the correlation coefficients were treated with t test, the results were also found significant for the given correlations.

**Key words:** Smart Phone Addiction, Dark Personality Triad, Narcissism, Psychopathy Machiavellianism

## Introduction:

Use of smart phone is an essential requirement for fast communication, entertainment and a medium of education too. After Covid-19 there is a tremendous growth spurt in the use of smart phone and internet. However, the excessive use of the smart phone gazettes and various apps is leading to adverse effects on teenagers and the youngsters, popularly known as the Gen Z. Internet games like 'Blue whale challenge', 'Pink whale challenge', 'Pokoman go', taking selfies or making reels at risky places like on running railways or at the overflow dams indicates that in Gen Z internet addiction is increasing day by day and they are becoming over conscious about their presence in social media. Even in interpersonal relationships, social media has caused tremendous change. One-to-one contact is replaced by virtual relationship and this has led to e-identity and e-personality (Aboujaoude, 2011).

## Smart Phone Addiction and Dark Personality Triad :

Many researchers have examined the role of social media and personality traits. The results

 ISSN No. 2394-5990

of these studies suggest that social media activity is related to several obsessed personality traits. This is a big avenue to investigate whether these traits are developed out of the influence of social media or such traits enable an individual to use this media at great extent. Jonason and Gregory Webster (2010) called it 'the dark triad' of personality; it includes Narcissism, Sociopath and Machiavellianism. Fox and Rooney (2015) have argued that selfie can be associated with the dark triad. Generally, individuals who like selfies tend to enjoy them and feel that taking them as an important activity in their daily lives. Moreover, they always look for places where they can take selfies and are upset if they are prevented from taking selfies (Peerayuth, 2016). Narcissistic individuals tend to develop positive self views of certain traits such as intelligence, physical attractiveness and power (Mehdizaeh, 2010). These characteristics of narcissism can potentially explain why some individuals are obsessed with selfies. This has led to search the role of Smart Phone addiction in dark personality triad.

**Literature Review:**

There are certain evidences about the linkage between selfies and dark personality triad. Fox and Roony (2015) found a strong connection between narcissism and the number of selfies posted. Selfie posting frequency was strongly associated with the leadership/authority and grandiose exhibitionism. Qiu et al. (2015) suggested that selfies may be associated with personality traits such as agreeableness and extraversion. Sorokowski et al. (2015) found the linkage between overall narcissism scores and own selfie posting was stronger for males than for females. Fox and Rooney (2015) also argued that excessive use of social media can potentially lead to unhealthy behaviors such as narcissism and selfishness. Alloway, et al. (2014) found that elevated level of narcissism damage an individual's ability to shape healthy and mutually beneficial relationships. They are more prone to respond with violent and aggressive behavior after being critiqued. However, Carpenter (2012) Griffiths (2005) has proposed that extremely preoccupation with social media and investing too much time can interferes with other vital aspects of life.

The review mentioned so far reveals that there is a close connection between excessive use of Smart Phone, some personality traits including Narcissism, Sociopath and Machiavellianism.

**Aim and Objectives:**

Main aim of this paper is explore the strength of association between Smart Phone Addiction and development of Dark Personality Triad in the Gen Z.

**Major objectives of the study are :**

1. To examine the strength of association between Smart Phone Addiction and Dark Personality Triad
2. To examine the strength of association between Smart Phone Addiction and Narcissistic personality characteristics.
3. To examine the strength of association between Smart Phone Addiction and Sociopath personality characteristics.
4. To examine the strength of association between Smart Phone Addiction and Machiavellianism personality characteristics.

**Hypotheses :**

Assuming other factors are kept constant following null hypotheses were framed

1. There will not be any strength of association in Smart Phone Addiction and Dark Personality Triad.
2. There will not be any strength of association between Smart Phone Addiction and Narcissism personality characteristics.
3. There will not be any strength of association between Smart Phone Addiction and Narcissism personality characteristics.

4. There will not be any strength of association between Smart Phone Addiction and Machiavelli personality characteristics

**Scope and Methodology :**

The scope of the study is bound to collegians offering various professional and non-professional study courses. The sample was comprised of 348 students (Male 100, female 248).

Tools- Smart Phone Addiction Scale by Dr. Vijayshri and Dr. Masaud Ansari (2021), Dark Personality Triad Scale (Short form) by Jones and Paulhus (2014) to measure the prevalence of Narcissism, Psychopathy and Machiavellianism

Design- A correlational design was used.

Statistics- Product moment correlation and t test

**Interpretation and Discussion:**

The study aimed to explore the strength of association between Smart Phone addiction and the traits of Dark Personality Triad, namely Narcissism, Psychopath, and Machiavellianism. The obtained values are depicted in the following tables.

**Table No. 1: Mean and SD**

| | Smart Phone Addiction | Personality Triad | Narcissism | Psychopathy | Machiavellianism |
|---|---|---|---|---|---|
| Mean | 52.30 | 68.65 | 30.50 | 14.77 | 23.38 |
| SD | 15.27 | 11.59 | 5.52 | 3.7 | 4.42 |

**Table No. 2: Correlation and t values**

| | Smart Phone Addiction | |
|---|---|---|
| | r (0.27) | t (2.60) |
| Personality Triad | 0.52 ** | 11.32 ** |
| Narcissism | 0.27 ** | 4.81 ** |
| Psychopathy | 0.54 ** | 12.00 ** |
| Machiavellianism | 0.46 ** | 9.44 ** |

The correlation coefficient between smart phone addiction and personality triad is 0.52 is found significant ($p<.01$ at two tailed test). Therefore the first hypothesis, there will not be any strength of association in Smart Phone Addiction and Dark Personality Triad is rejected. In the present context this significant correlation can be attributed to the social media influence.

ISSN No. 2394-5990

This is mainly because this generation is also known as internet generation and can be considered the pioneers of mobile technology (Shrivastava, 2023).The virtual world of smart phone and social media satiate the need of gregariousness of this Gen Z. Chung et al. (2018) found that social media addiction tend to different behavioral pattern and cognitive thinking, thus leading to form a typical personality pattern. Casale et al. (2016) have proposed that social media provides them an alternative to feel more secure in virtual relation and virtual environment. Similarly, Dimircioglu & Kose (2018) and Andreassen et al., (2017), have pointed out that members of dark triad traits put high importance on their interpersonal needs and they will ensure that their needs are met at the end. Hence, it can be said that social media can be used to form online relationships it allows youngsters to disguise their weaknesses and exhibit their best side.

Hypotheses no. 2, 3 and 4 were related to Narcissism, Psychopathy and Machiavellianism; respectively. All hypotheses were rejected. On the contrary the observed values depicted in table no. 2 indicates significant positive correlation between smart phone addiction and all there prevalence of dark personality triad i.e. Narcissism (0.27** $p<0.01$), and Psychopathy (0.54** $p<0.01$) and Machiavellianism (0.46** $p<0.01$). For cross verification all four correlation coefficients were treated with t test. The obtained values are given in Table No. 2 yielded significant results, thus, refuting all null hypotheses; on the contrary it can be concluded that smart phone addiction has strong and positive influence in the formation of dark personality triad. These findings are supported by previous studies. Gwenn Schurgin O'Keeffe & Kathleen Clarke-Pearson (2011) have concluded that engaging in various forms of social media is a routine activity that benefit children and adolescents by enhancing communication, social connection and even technical skills. However, Zao & Zhou (2021) have concluded that despite the obvious advantages of social media in an emergency situation, such as Covid-19, higher use of social media use is likely to need to social media addiction. Bergman et al., (2011) have reported that Narcissists are prone to addict to social media because of their high expectations for affiliation and social media can help them to conceal their bad side as they can choose what they wanted to share. Casale, et al., (2016) stated that narcissists are reluctant to accept the fact that they are lacking in real life, hence, online activities provide a better control on what people see to boost their ego which could cause addictive use of social media. In a study by Necula (2020) the results showed positive correlation between social media addiction and Machiavellianism and also between social media addiction and Psychopathy. Lopes and Yu (2017) concluded that excessive use of smart phone and social media enables Machiavellists and Psychopaths to utilize social media to engage in undesirable behaviors such as causing conflict and breaking the laws.

**Conclusions:**

Considering the statistical findings all null hypotheses were rejected and it is concluded that..

1) There is a close connection between smart phone overuse and dark personality triad in total; both are positively and significantly correlated.
2) There is a close connection between smart phone overuse and Narcissistic personality pattern; both are positively and significantly correlated.
3) There is a close connection between smart phone overuse and psychopathic personality pattern; both are positively and significantly correlated.

4) There is a close connection between smart phone overuse and Machiavelli personality pattern; both are positively and significantly correlated.

**Limitations :**

The study have certain limitations. The scope is limited to the students enrolled in various study streams in Vidya Bharati Mahavidyalaya, Amravati only. The responses were sought in online form. Both tools were translated in Marathi language. The variable of gender was isolated as the data was skewed, 71.3 % respondents were female and 28.7 % were male.

**References :**


- Aboujaoude, E. (2011). *"Virtually You: The dangerous powers of the e-personality"*. New York: W.W. Norton.
- Alloway, T., Runac, R., Qureshi, M. & Kemp, G. (2014). "Is Facebook Linked to Selfishness? Investigating the Relationships among Social Media Use, Empathy and Narcissism". *Social Networking*, 3, 150-158.
- Bergstrom, R. L., Neighbors, C. and Malhein, J. E. (2009). "Media comparisons and threat to body image: Seeking evidence of self affirmation". *Journal of Social and Clinical Psychology*, 28(2): 264-280.
- Carpenter, C. J. (2012). "Narcissism on Facebook: Self-promotional and anti-social behavior". *Personality and Individual Differences*, 52(4), 482-486. http://dx.doi.org/10.1016. j. paid. 2011. 11. 011.
- Casale, et al., (2016). Grandiose and Vulnerable Narssists: Who is at Higher Risk for Social Networking Addiction? Cyberpsychology, Behavior and Social Networking, 19(8), 510-515. https:doi.ori/10.1089/cyber.2016.0189
- Chung, et al., (2018).The role of the Dark Triad and Impulsivity in Social Media Addiction: findings from Malaysia. Personality and Individual Differences, 143, 62-67. https://doi.org/10.1016/j.paid.2019.02.016
- Dimircioglu & Kose, (2018). Effects of attachment styles,dark tirad, rejection sensitivity and relationship satisfaction on social media addiction: A Mediated Model. Current Psychology,40 (1), 414-428. https://doi.org/10.1007/s/2144-018-9956-x
- Fox, J. & Roony, M. C. (2015). "The Dark Triad and trait self-objectification as predictors of men's use and self presentation behaviors on social networking sites". *Personality and Individual Differences*, 76, 161-165. http://dx.doi.org/10.1016/j.paid.2014.12.017.
- Griffiths, (2005). A 'Component' model od addiction within a biopsychosocial framework. A Journal of Substance Us, 10 (4), 191-197. https://doi.org/10.1080/14659890500114359.
- Gwenn Schurgin O'Keeffe & Kathleen Clarke-Pearson (2011). "The Impact of Social Media on Children, Adolescents and Families". Pediatrics. DOI: 10.1542/peds.2011-0054.
- Hare, R. D. (1991). "Manual for the Hare Psychopathy Checklist-Revised". Toronto: Multi-Health Systems.
- Hare, R. D. (1993). *"Without conscience: The disturbing world of psychopaths among us"*. New York: Pocket Books.


■■■

DS

# विद्यावार्ता®

Issue-49, Vol-09, Jan. to March 2024

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Editor

Dr.Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2024
Issue 49, Vol-09

Date of Publication
01 Mar. 2024

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# INDEX

01) DRAINAGE ANOMALIES IN PENINSULAR INDIA
**Dr. Vilas K. Kale, Chandrapur** ||10

02) Analyzing Challenges Faced by e-banking Customers: A....
**Beena Kaushik, Chhota Bangarda, Indore** ||16

03) Marathi Film Fandry : A Social Documentary
**Dr. S. S. Sasane, Beed** ||21

04) Study of the importance of the philosophical, educational and....
**Mrs. Jyoti, Swati Verma, Duhai, Ghaziabad** ||23

05) Disability- Does Teacher's Gender Impact on Their Attitude....
**Dr. Sapna Sharma, Hapur, (U.P.)** ||27

06) Quality of Teaching- A Case Study of Classroom Practices in....
**Rupa Das, Dr. Meenakshi Sharma, Meerut** ||35

07) Gaga Tshering Dukpa ; A freedom fighter from the Mountain....
**Dr. Gouri Dey, Darjeeling** ||39

08) नव्वदोत्तरी आंबेडकरी कवी रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील....
**सहा. प्रा. दीपक वानखडे, अमरावती** ||43

09) नागपूरकर भोसल्यांचे सल्लागार देवाजीपंत चोरघडे
**प्रा. डॉ. गजानन न. कळंबे, भंडारा** ||48

10) आदिवासी कला व सण उत्सवातील वैविध्यता
**डॉ. विठ्ठल शंकर केदारी, किल्लेधारूर** ||51

11) स्वातंत्र्यपुर्व काळातील अकोला जिल्ह्यातील स्त्री शिक्षणाची....
**डॉ. संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी, अकोलौ** ||57

12) शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील सघटनात्मक वातावरण आणि शिक्षक...
**डॉ. कैलास दौंडकर, प्रा. साठे हनुमंत देवराम, चाकण, ता. खेड जि. पुणे** ||60

13) नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे कार्य
**बचाटे श्रीनिवास दत्तात्रय** ||63

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Jan. To March 2024
Issue-49, Vol-09


08

# नव्वदोत्तरी आंबेडकरी कवी रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील प्रतिमांचे निराळेपण

सहा. प्रा. दीपक वानखडे
मराठी विभागप्रमुख,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
पार्वती नगर, नं. २ अकोली रोड अमरावती.

**********

**प्रस्तावना –**

'महादंबा' या महानुभाव पंथाच्या साध्वी ने मराठी कवितेची सुरुवात केली. ती विदर्भात. आज ८०० वर्षानंतर मराठी कवितेचा विस्तार कितीतरी पटीनेवाढला आहे. मराठी काव्यपरंपरेत विविध प्रवाह,उपप्रवाह निर्माण झाले. स्वातंर्त्र्योत्तर कालखंडा मध्ये विशेषत: मराठी वाङ्मयाच्या प्रांतामध्ये ७० च्या दशकात उपेक्षित वंचित समूहाच्या शिक्षित पिढीकडून कवितेच्या रूपात काव्य अभिव्यक्ती होऊ लागली. या काव्याअभिव्यक्तीला सुरुवातीला 'दलित कविता' म्हटल्या गेले. हीच संकल्पना विस्तार रूप घेऊन आज आंबेडकरी कविता या नावाने मराठी कवितेच्या प्रांतात विस्ताराने संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या अविस्कृत झाली आहे. 'आंबेडकरी कवितेची' ठळक वैशिष्ट्ये म्हणजे चातुर्वर्ण्य समाज रचनेतून शूद्रांच्या वाट्याला आलेल्या वेदना, शूद्रपण लादणाऱ्या व्यवस्थेच्या सर्वत्र विकृतीला नकार व आक्रमक विद्रोह अशा तीन बिंदूंवर ही कविता विस्तारली आपल्याला दिसते.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेतपासून आपण विद्रोही कवितेचा आरंभबिंदू मनाला आहे. आहे. यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे, ज.वी पवार, वामन निंबाळकर, लोकनाथ यशवंत आदी विद्रोही आंबेडकरवादी कवी त्यात भर टाकीत आहेत. आंबेडकरवादी कवितेणे एकूण मराठी कविते स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले आहे. ती वास्तवाभिमुख व परिवर्तनाची आस घेऊन व्यक्त होणारी कविता आहे. मराठी कवितेचे परंपरागत निकष, नियम व चौकटीला सांभाळीत त्य कधी नाकारित ती आविष्कृत होते आहे. आशयाच्या अंगाने ती विस्तारते आहे, प्रतिमा, प्रतीके, अलंकार या वाङ. मयीन विशेषानी ती परिपूर्ण आहे. आंबेडकरी कवितेच्या प्रवाहातील विदर्भातील महत्वाचे कवी म्हणून अमरावती येथील दलित आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते दलित पँथरच्या सुरुवातीच्या फळीतील अग्रणी, वाङ. मयीन चळवळीशी जुळलेले श्री. रमेशचंद्र कांबळे या कवीचा विशेष उल्लेख करता येईल.

**१. रमेशचंद्र कांबळे परिचय**

रमेशचंद्र कांबळे हे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील अमरावती परिसरातील नामांकित कवी असून १९७० पासून ते काव्य लेखन करत आहेत. १९८० च्या आसपास त्यांनी 'सिद्धार्थ साहित्य संघ' स्थापन करून अमरावती मधील प्रतिभावंत मंडळीसाठी विचारपीठ उपलब्ध करून दिले. सिद्धार्थ साहित्य संघाच्या माध्यमातून नवीन काव्य लेखनात पदार्पण करणाऱ्या कवींना विचारपीठ मिळाले. असे कवी ते व्यक्त होऊ लागले. दलित पँथरचे देदीप्यमान आंदोलन आणि रिपब्लिकन चळवळ यामध्ये सुद्धा रमेशचंद्र कांबळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. काही काळ त्यांनी 'कोलीत' हे वाङमयीन नियतकालिक सुद्धा त्यांनी चालवले. एकूणच अमरावती मधील आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीच्या जडणघडणीमध्ये रमेश चंद्र कांबळे यांचे व्यक्तिमत्त्व हे प्रेरक व्यक्तिमत्त्व ठरले आहे त्यांचे एकूण तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहे. 'मृत्यू जगलेला माणूस', प्रकाशक डॉ.सुखदेव ढाणके, सर्वमंगल प्रकाशन, सहजानंद नगर, मोर्शी रोड. अमरावती. प्रथम आवृत्ती एप्रिल २०१२. या कवितासंग्रहाच्या मनोगतात कवीने आपली भूमिका वाचकांसमोर ठेवली आहे याशिवाय 'कवी रमेशचंद्र कांबळे : 'मृत्यू जगलेला माणूस' – या शीर्षकांतर्गत डॉ. किशोर सानप यांची एकूण १८ पृष्ठांची दीर्घ प्रस्तावना या कवितासंग्रहात समाविष्ट आहे. या प्रस्तावनेतून डॉ किशोर सानप यांनी रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेचे यथोचित मूल्यमापन केले आहे. या

कवितासंग्रहात एकूण ३१ कवितांचा समावेश आहे.

'चौथी भिंत', साक्षी प्रकाशन, नवानकाशा, नागपूर, जानेवारी २०१६. या कवितासंग्रहात 'चौथी भिंत'— विचार क्रांतीचा नवा एल्गार — या शीर्षकांतर्गत मा. शिवा इंगोले यांची एकूण १० पृष्ठांची विस्तृत व समर्पक अशी प्रस्तावना समाविष्ट आहे. या कवितासंग्रहात एकूण ३५ कवितांचा समावेश आहे.

'एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू', साक्षी प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०२१. या कवितासंग्रहाला सुप्रसिद्ध कवी अर्जुन डांगळे यांनी कांबळे यांच्या कवितेचे यथोचित मूल्यमापन केले आहे. या कवितासंग्रहात एकूण ४६ कवितांचा समावेश आहे. या तीनही कविता संग्रहात समाविष्ट असणाऱ्या एकूण ११२ कवितांच्या संदर्भा एकत्रित भाष्य इथे अपेक्षित आहे.

**२. रमेशचंद्र कांबळे यांच्या काव्य अभिव्यक्तीच्या प्रेरणा व प्रभाव**

रमेशचंद्र कांबळे आपल्या काव्य लेखनाची प्रेरणा सांगताना लिहितात की, 'बदलत्या जीवनाचे संदर्भ व विचार मी फुले शाहू डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बुद्ध यांच्या मौलिक विचारातून वेचले आहेत जगाच्या रंगभूमीवर जीवनाचे जे महानाट्य रंगते त्यातला खरा नायक सामान्य माणूस हाच आहे आणि हाच सामान्य माणूस माझ्या कवितेचा नायक आहे म्हणून माझी कविता या माणसात केंद्रस्थानी मानते व त्याच्या सुखदुःखाच्या अवतीभोवती फिरते त्याला नियंत्रित व संस्कारित करण्याची भूमिका अदा करते'[१]. रमेशचंद्र कांबळे यांच्या तीनही कवितासंग्रहातील कवितेवर, कवितेचे ऊर्जा केंद्र असणाऱ्या नामदेव ढसाळ यांच्या शैलीचा प्रभाव जाणवतो. ढसाळ यांची कविता जेव्हा प्रकाशित झाली तेव्हा संपूर्ण मराठी काव्यविश्वाला तिने हादरे दिले. याचा परिणाम म्हणून प्रतिभावान आंबेडकरी कवी, ढसाळ यांच्या साच्यातली कविता लिहू लागले त्यापैकी अनेकांना ती हाताळता आली तर अनेकांना ती हाताळता आली नाही. रमेशचंद्र कांबळे यांना मात्र ती हाताळता आली असे म्हणता येते कारण तीनही कवितासंग्रहात कवितांचा अभ्यास केल्यास आपल्याला असे विधान नक्की करता येते. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितांवर भाष्य करणाऱ्या सर्वच समीक्षकांनी विचारवंतांनी असा उल्लेख केला आहे.

**३. रमेशचंद्र कांबळे कांबळे यांच्या कवितेतील प्रतिमा—**

रमेशचंद्र कांबळे यांच्या कविता रुपके, प्रतिमा अलंकार समाविष्ट आहेत या सर्व प्रतिमा आंबेडकरी समूहाचे जगणे, पूर्वापर शोषण, गुलामी, पिचलेपण, व्यथा, वेदना, नकार, विद्रोह, विचारविश्व, आचरण व कृती याला समांतरपणे अभिव्यक्त करणाऱ्या ह्या प्रतिमा आहेत. काही निवडक प्रतिमा पुढील प्रमाणे —

अंधार, राख, निखारा, अंकुर, दगड, निषेध, बुब्बुळ, मुठ पुल्लिंग, वेदना, बळ, महापूर, अरबी घोडा, जखम, डोंगर, राख, विस्तव, मौन, थुंकी, पुल्लिंग, शौर्य गीते, वांझोटा, प्रहार, राख, सावध, नवा सूर्य, निराश्रीत, सांगाडा, मशाल, उरूस, भेद रेषा, मापदंड,दिग्विजय, युगंधर, क्रांतिबीज, सूर्य वीज, स्वप्न, पहाट, वनवा, गाव, मूठ, युद्ध, काळोख, बंदिस्त, ६ ाागा, लोरी, प्यादे, सुरुंग, भिंती, गुलाम, सुरुंग, वधस्तंभ तटबंदी, चेहरा, शिल्प, चिलीम, अग्नीफुले, श्वास, राजमार्ग, लिलाव, खुर्ची, कैफ, घरट, करूणा, साखरदंड, खलपुरुष, ध्वज, शवागार, सनातन, गर्दी, सनद, पहाट, साक्ष, कफन, वारा, ओंजळ, काळरात्र, उजेड, पुल्लिंग, काळोख, पंख, श्वास, झुंज, तुरुंग, नपुसक, तेज, गुहा, अनौरस, म्होरका, धुके, निखारे, जखम, उत्खनन, शिपाई, षंढ विस्तव, आरोप, उजेड, जाळ, इमान, जाळ, पहाट, स्वापद, शेंदूर, सूर्यास्त, भडवे, यात्रा, आक्रोश, वेसन, गदारोळ, प्रश्न, निषेध, संभ्रम, नकार, झेंडा, कुठली मुखवटा (वरील सर्व'मृत्यू जगलेला माणूस' या कवितासंग्रहातील आहेत )

सारीपाट, मसीहा, समुद्र, गर्जना, मृत्यूगुहा, आतडे, पीळ, कोंडवाडा, आलेख, लेणी, भिंत, अश्व, मुठ, ख्रिस्त वाळवंट खुळखुळा, ठिणगी, वादळ, बुरुज, कफन, डोह, शाश्वत, आग, कफन, भिंती, सूळ,ध्वज, उत्सव, स्मशान, वटहुकूम, कोंडवाडा, चिंध्या, वारुळ, विष, पंख (वरील सर्व 'चौथी भिंत' या कवितासंग्रहातील आहेत.) सावज, डोंगर, फासे, मशाल, इच्छामरण, नांदी, तरंग, कुंपण, शून्य, द्वंद्व, दंतकथा, वधस्तंभ, मृत्यूवार्ता (वरील सर्व 'एका महिला कैद्याचा गुढ मृत्यू'या कवितासंग्रहातील आहेत.)

४. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील रूपकांचे निराळेपण —

रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेत रूपकांची रेलचेल आहे हे रूपके आंबेडकरी समूहाच्या अंतर्मनातील चार वर्षापासून चा उदवेग तिरस्कार व बंड व्यक्त करणारे आहेत समर्थक रूप की कवी आपल्या कवितांमधून साकार करतो उदाहरणार्थ काही रूपके खालील प्रमाणे—

अंधार कोठडीतील दिवे ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१), शतकानु शतकांची राख, निर्भीड उद्‌गार ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३), अश्रू आटलेले निस्तेज डोळे , हत्यार बंद श्वास ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.६), वेदनांचा महापूर, विव्हळणारा बुद्ध, अंतर्मनातील जखम ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.७), करुणामय मंत्र, व्रतस्थ माणसाचे मौन ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. ८), भूतकाळाची बंद कुपी, वाया गेलेले वांझोटे दिवस ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.९), परावर्तित्वाचे धनी ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१०), बेईमान ऊरूस ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. १२), पोथीनिष्ठ अनुयायी, मिराजदारीची परंपरागत वतनदारी ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१३), सूर्यातील आग, विजांचा कडकडाट, स्वातंत्र्याचा थकलेला सूर्य ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१५), अथांग काळोख, बरगड्यात बंदिस्त आपण ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. १६), गर्भातील अग्नीफुले ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. १७), निष्ठांचा लिलाव ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. १८), विद्रोही पेशी ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१९), सेंद्रिय संस्कृती, मानव मुक्तिचा ध्वज ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२१), लोकशाहीचे शवागार, अभद्र साथ, उद्याची वर्णहीन पहाट, सनातन मनसुबे, निष्पाप श्वास ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२२), दुःखाचा आलेख ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२३), अश्रापीत उजेड, वत्सल हात, वादळाचे बळ, विद्रोहाचे स्फुलिंग ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२४), निस्तब्ध काळोख भेटलेले शहर युद्धखोर आदर्श ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२५), नपुसक मूल्यविचार, छाटलेले पंख, झाकून टाकणारा सूर्य ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२६), चिरंतन युद्धाचे विभत्स तपशील, निष्णात योध्दे, युद्धातील चिरंतन जखमा ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२७), विझलेले निखारे, संभ्रमाचे धुके ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२८), दगडी हृदय ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२९), स्वप्न सावले ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. ३०), पहाटेचे श्वास, हत्तीचे बळ, दुभंगलेला अंधार, अधांतरीत श्वास ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३३), भडव्यांच्या जत्रा, श्वापदाच्या वस्तीत सूर्यास्तानंतरचा युद्धविराम, सत्तेचे सिंहासन, तहाच्या अटी ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३४), व्यवस्थेचे शेपूट, लोकशाहीची यात्रा, दहशतिचे अदृश्य पावलं, भुकेचे महायुद्ध, सत्याचा आक्रोश, दहशतीचे अदृश्य पावलं, भुकेचे महायुद्ध ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. ३५), सुलतानी संस्कृती, अनुत्तरित प्रश्नांची सनद, स्वयंघोषित सार्वभौमत्वाचा झेंडा, रीता देह ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. ३६), वर्तमानाचा काळोख, भयभीत चेहरा, अजस्त्र अंधार कोठडी, विछिन्न केलेला पुरुषार्थ ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३७), बिन चेहऱ्याचा माणूस ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३८), हिंस्त्र नजरा ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३९). सतेज दृष्टी, प्रकाशाची पावले ('चौथी भिंत' पृ. २१), अभद्र मेंदू, भिंतींचा अनादिबंध, नाकर्तेपणाचा वर्तमान अंधार २२, अंतरंगात साचलेला नरक, अस्वस्थ वादळी अवस्था ('चौथी भिंत' पृ. २३), मृत्यू गुहेतील काळोख, बिभत्स तपशील ('चौथी भिंत' पृ.२४), भुकेची अमर्याद खोली आतड्यांचा गुंता, श्वासांना पडणारे वेदनांचे पीळ, काळाचा कोंडवाडा, विचारांचे बधिरिकरण, फसवा आलेख ('चौथी भिंत' पृ. २५), आदिम दुःखाच्या जुनाट लेण्या, काळाचे आत्मकथन, इतिहासातील छळांचे दुर्मिळ दाखले ('चौथी भिंत' पृ. २७), नाकर्तेपणाचा वर्तमान काळोख ('चौथी भिंत' पृ.२८), बुलंद गर्जना, अपूर्व अस्तर, युगांचा गर्द काळोख ('चौथी भिंत' पृ. २९), अश्रापित मुडदे उजेडाचे स्वप्न ('चौथी भिंत' पृ. ३०), निर्विकार चिंतन, सत्तेचा खुळखुळा, ख्रिस्ताची करुणा, व्यवस्थेचे उजाड वाळवंट, सम्यक दृष्टी ('चौथी भिंत' पृ. ३१), नका रात्रीचा काळोख, यातनांचा बुरुज ('चौथी भिंत' पृ. ३२), दुःखाचा आकंठ डोह, भविष्यावर कफन टांगून, शाश्वत सत्य ('चौथी भिंत' पृ. ३३), घायाळ डोळे, अस्तित्वावर कफन पांघरून ('चौथी भिंत' पृ. ३४), विद्रोहाचे बीज, प्राणांतिक वेदनेच्या कळा, गतीच्या देहात ('चौथी भिंत' पृ. ३६), विलोभनीय षडयंत्र ('चौथी भिंत' पृ. ३७), शत्रूचे कावे ('चौथी

भिंत' पृ. ३८), अस्वस्थ श्वासांच्या गदारोळात ('चौथी भिंत' पृ. ३९), विद्रोहाच्या सीलबंद कुपित, आसवांच्या सागरात, रक्ताचा ध्वज, सत्तेच्या उत्सव, अपभ्रंश झालेला मेंदू, धर्मशाळेने स्मशान ('चौथी भिंत' पृ. ४०), वस्त्रहीन राज्याच्या मिरवणुकीत, वेदनेचे गाव, स्वातंत्र्याचा उजेड ('चौथी भिंत' पृ. ४१), लढ्याचे तळपते हत्यार, आकाश वेधी डोळे, वनव्याचे वादळ ('चौथी भिंत' पृ. ४२), काळ्या सत्तेचे पाणी ('चौथी भिंत' पृ. ४३), जुलमी वटहुकूम ('चौथी भिंत' पृ. ४४), सनातन संघर्ष ('चौथी भिंत' पृ. ४५), प्रश्नांची वावटळ, द्वेषांचा वनवा ('चौथी भिंत' पृ. ४७), निस्तब्ध काळोख ('चौथी भिंत' पृ. ४८), अस्त्रासारखे शब्द ('चौथी भिंत' पृ. ४९), बंदिस्त श्वासांचे अस्वस्थ आलेख ,नागड्या शापित रक्तांचा दर्प, वादळांचे झंजावात ('चौथी भिंत' पृ. ५५), विकृत वाचनाच्या वस्तीत, सत्तेचा उन्माद, दीर्घ नकार ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.१७), प्रश्नांच्या प्रदेशात, उजेडाचे संकेत ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.१६), वर्चस्वाच्या उतरंडी ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.२५), नग्न सत्य ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.२६), आश्वासक आर्द्रता, बधिर शांतता ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.२८), काळाच्या अदृश्य भिंती ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.३०), वांज आयुष्याचा लेखाजोखा ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.३१), वैचारिक मृत्यू ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३४), निग्रही डोळे ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३४), सुडाचे वैश्विक वर्तुळ, आंधळा क्रोध ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३८), मूक आकांत ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.४१), निशब्द आर्त हाका ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.४१), नवी पहाट ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.४२), चकव्यांचा जंजाळ ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ.४५), दु:खाचा सांगाडा ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ५७) इत्यादी. अशा समर्पक रूपकातून आशयला रेखांकित करण्याचे कसब कांबळे यांना प्राप्त झाल्याचे दिसते. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेच्या संदर्भात डॉ. किशोर सानप लिहितात की, "दलित चळवळीत कुठलीही भूमिका न घेता विद्रोहाचे अवडंबर न वाजवता रमेशचंद्र कांबळे यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करीत विद्रोहाचे पाणी पेटवताना दिसते. आंबेडकरांची निळी पहाट डोळ्यात वागविणाऱ्या या कवीला उजेडाचा ध्यास आहे''

**५. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील रूपकांचे निराळेपण वाक्प्रचारात्मकता –**

अंगावर निळे आकाश झाकणे, मुक्तीत हर्षाचे बळसंचारणे, शरीरावर लढे गोंधळून घेणं, अस्तित्वावर मरण नोंदवून घेणे ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१३), दु:खाचा आलेख ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.१३), प्रलयंकारी होऊ शकतो, तृष्ण ओंजळ, भयाने काळगात्र थरथरणे ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२४), उजेड पेरणे ('चौथी भिंत' पृ २५), उर्जेवर वादळांचे गेपण करणे ('चौथी भिंत' पृ ३६) अस्तित्वाला डोळे फुटणे ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. २१), अंधाराने मौन पांघरणे ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ४०) इ.

**७. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील इंग्रजी शब्द–**

रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेत ओघाने काही इंग्रजी शब्द येतात. उदा. इझम, सिगरेट, अलर्ट, बॅन ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. २५), इझम ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३७), सिस्टीम ('मृत्यू जगलेला माणूस' पृ. ३८), ग्लोबल,पोस्टर, पेस्ट, एनलार्ज, डिजिटल ('चौथी भिंत' पृ. २६), ट्र्याइझडी ('चौथी भिंत' पृ. २७), कमिटमेंट ('चौथी भिंत' पृ. ३६), क्लोजअप ('चौथी भिंत' पृ. ४३), कन्फ्युज ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. २५), शार्प शूटर, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३१), रिस्टोअर, (एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३५), मास हिस्टेरियन, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३६), ऑक्टोपस, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ५८) इ.

**८. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील अनुप्रासात्मक रचना –**

रमेशचंद्र कांबळे यांच्या काही काव्यरचनेत अनुप्रास अलंकाराचा वापर केला आहे.मखमली मौन, कफल्लक काफिल्यांना कुरवाळीत ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.२६), लौकिक लफंगेपण ('मृत्यू जगलेला माणूस' पृ.३१), काळाचा कोंडवाड ('चौथी भिंत' पृ. २५), वनव्याचे वादळ, ('चौथी भिंत' पृ. ४२), विकृत वाचनाच्या वस्तीत ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. १७), प्रश्नांच्या प्रदेशात, ('एका महिला कैद्याचा

गूढ मृत्यू' पृ. १६), वैश्विक वर्तुळ, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३८), किती काळ सोसावी कळ, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ५४) इ.

**९. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील विरोधाभासात्मक रचना—**

रमेशचंद्र कांबळे यांच्या काही काव्य रचना विरोधाभासात्मक आहेत. उदा. बिन काळजाचे चेहरे, जमीन दोस्त उंच हवेली यांचे मनोरे ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३७), निशब्द कल्लोळ ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ३६), मूक आकांत, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ४१), निशब्द आर्त हाका, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ४१), बिन सावलीच्या झाडाखाली, ('एका महिला कैद्याचा गूढ मृत्यू' पृ. ५५) रमेशचंद्र कांबळे यांच्या कविता संग्रहातील रेखाटणे कवी दिगंबर झाडे यांची आशयानुरूप अनुक्रमे ८ रेखाटणे, १४ रेखाटणे, २६ रेखाटणे ही रेखाटणे कवितेच्या आशयाची समांतर आहेत. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील मुखपृष्ठ तीनही कवितासंग्रहाची मुखपृष्ठ ही प्रतीकात्मक आहेत. बहुअर्थ सूचक आहेत. रमेश चंद्र कांबळे यांच्या कवितेवर भाष्य करताना श्री. शिवा इंगोले लिहितात की, रमेशचंद्र कांबळे यांची कविता वाचताना किंवा कवितेचे निवेदन निरखताना नव्या जाणीवांनाही उजागरता प्राप्त झालेली आहे. हेही आपल्या लक्षात येते आणि असेही लक्षात येते की, भाषा लय आणि प्रतिमांचा प्रभाव नैसर्गिक रित्या हाताळण्यात कवी सरस ठरला आहे"[३]. एकूणच अंबिडकरी कवितेच्या प्रांतात रमेशचंद्र कांबळे यांची कविता वाङ्मयीन दृष्ट्या सकस व संपन्न आहे असे म्हणता येते.

**निष्कर्ष :**

१. एकूण मराठी कवितेमध्ये नव्वदोत्तरी आंबेडकरी कवितेचे वेगळे व वैशिष्ट्येपूर्ण असे स्थान आहे.

२. रमेशचंद्र कांबळे यांची आंबेडकरी कवितेवर नामदेव ढसाळ यांच्या कवितेचा प्रभाव आहे.

३. रमेशचंद्र कांबळे यांची कविता सामाजिक आशयाची असून, सामान्य माणूस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व चळवळ हे त्यांच्याकवितेचे केंद्रबिंदू आहे.

४. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेमधून संघर्ष, लढाऊ बाणा, आशावाद, स्त्री संवेदना, वंचितांना न्याय मिळावा यासाठीची आग्रही भूमिका व विद्रोह प्रभावीपणे व्यक्त झाला आहे.

५. एकूणच आंबेडकरी नव्वदोत्तरी कवितेत रमेशचंद्र कांबळे यांची कविता वाङ.मयीन दृष्ट्या सकस असून प्रतिमा व रूपकांनी सजली आहे.

**संदर्भ :**

१. रमेशचंद्र कांबळे, 'मनोगत मृत्यू जगलेला माणूस', सर्वमंगल प्रकाशन, सहजानंद नगर. मोर्शी रोड. अमरावती. प्रथम आवृत्ती एप्रिल २०१२. पृ ३.

२. डॉ किशोर सानप, प्रस्तावना — 'मनोगत मृत्यू जगलेला माणूस', सर्वमंगल प्रकाशन, सहजानंद नगर. मोर्शी रोड. अमरावती. प्रथम आवृत्ती एप्रिल २०१२, पृ ३.

३. शिवा इंगोले, प्रस्तावना, 'चौथी भिंत', साक्षी प्रकाशन, नवानकाशा, नागपूर, जानेवारी २०१६, पृ ६

❑❑❑


DS

E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2024 Volume 04 Issue V (A)



Chief Editor : Dr. Girish S. Koli

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

January-March 2024 Volume 04 Issue V (A) SJIF Impact- 5.67

# Akshara Multidisciplinary Research Journal

**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**January-March 2024**

**Volume 04 Issue V (A)**

Scientific Journal of Impact Factor (SJIF) Impact-5.67

TOGETHER WE REACH THE GOAL

International Impact Factor Services

**International Society for Research Activity (ISRA)**
**Journal-Impact-Factor (JIF)**

Digital Online Identifier-Database System

*Akshara Publication*

Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2024 Volume 04 Issue V (A) SJIF Impact- 5.67



| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 22 | जागतिकीकरण व मराठी साहित्य | प्रा. दीपक स. वानखडे | 99 |
| 23 | ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप | श्री.संजय श्रीराम बैसाणे<br>डॉ.अक्षय किशोर घोरपडे | 104 |
| 24 | लोकनाट्य – तमाश | प्रा.डॉ.सौ. वंदना विनायक नढे | 111 |
| 25 | भारतातील महागाईचे वास्तव विश्लेषण | डॉ. शरद कैलास अग्रवाल | 116 |

E- ISSN 2582-5429

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Single Blind Peer Reviewed & Referred International Research Journal

January-March 2024 Volume 04 Issue V (A) SJIF Impact- 5.67

22

# जागतिकीकरण व मराठी साहित्य

प्रा. दीपक स. वानखडे

मराठी विभागप्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**प्रस्तावना**

आज अवघे जगच जागतिकीकरणाच्या संक्रमणातून जात आहे. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला साधारणपणे इ.स. १९८० साली सुरूवात होऊन आपल्या देशामध्ये इ.स. १९९० पासून जागतिकीकरणाची चर्चा होऊ लागल्याचे दिसून येते. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे आज परवलीचे शब्द झाले आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आज उद्योग, व्यापार, बँकिंगसेवा, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य इ. सर्वच क्षेत्रांना व्यापले आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत आज खेडेही समाविष्ट झाले आहेत. मुळात अवघे जगच एक 'वैश्विक खेडे' झाले आहे. ही जागतिकीकरणाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी जागतिकीकरणाची व्याख्या व त्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

**जागतिकीकरणाची व्याख्या**

'जागतिकीकरण' या शब्दाला अनेक कंगोरे आहेत. प्रत्येक विद्वानाच्या अभ्यासातून त्याचा एक नवीन चेहरा समोर येतो. जागतिकीकरणाबाबत विकीपिडिया शब्दकोषामध्ये म्हटले आहे की "ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये जगभरातील लोक एका समाजात एकत्र येतात. एकत्र काम करतात, राहतात वगैरे सर्व प्रकारच्या प्रवाहाचे एकत्रीकरण अर्थात मूलतत्त्ववाद वगैरे सोडून, म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण ही संज्ञा प्रामुख्याने जागतिक आर्थिकीकरणाला जोडून वापरली जाते. ज्यात पैसा, व्यापार, थेट गुंतवणूक, पत पुरवठा, परकीय देशात थेट गुंतवणूक, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था वगैरेचा संबंध येतो" [१]

ब्रिटानिका कोषामध्ये वस्तू, तंत्रज्ञान आणि कल्पनांच्या विस्तारामुळे जगभऱ्यातील जीवन सारखे करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण असे सांगितले आहे तर "अरिष्टग्रस्त भांडवलशाहीच्या हितसंबंधाने जगाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याची प्रक्रिया होय" [२] अशी जागतिकीकरणाची व्याख्या डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी केली आहे.

जागतिकीकरणाची व्याख्या करतांना उत्तम कांबळे म्हणतात, "वैश्विकरण म्हणजे दुसरे तिसरे काही नाही तर समाजातल्या बहुसंख्य वर्गाची दमछाक करण्यासाठी मांडलेला नवा खेळ, एक नवे षडयंत्र आहे" [३] तर डॉ. अशोक पळवेकर म्हणतात, "जागतिक पातळीवरील महासत्तांनी त्यांच्या देशातील लोकांना अत्युच्च जीवनमान जगता यावे यासाठी इतरांच्या शोषणावर आधारीत असलेली ही यंत्रणा जाणीवपूर्वक निर्माण केली आहे." [४]

**जागतिकीकरणाचे स्वरूप**

जगातील बहुतेक देशांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तर काही देशांत कारखानदारीत चालणारे उद्योगधंदे आहेत. या उद्योग व्यवसायावरून जगातील राष्ट्रांमध्ये गरीब, श्रीमंत असा भेद निर्माण झालेला आहे. भांडवलवादी राष्ट्रांनी विज्ञानाच्या बळावर कारखानदारी वाढवून वसाहतिक देशांमध्ये आपला व्यापार वाढविला. त्यातूनच फ्रान्स, ब्रिटन, जपान, जर्मनी आणि अमेरिका यासारख्या प्रगत राष्ट्रांमध्ये जागतिक भांडवलशाहीवर वर्चस्व निर्माण करण्याची स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे राजकीय व औद्योगिक क्षेत्रात बदल घडून आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी त्यांनी नव्या धोरणाची युक्ती शोधून काढली. गरीब, अविकसित राष्ट्रांना कर्जपुरवठा करणाऱ्या जागतिकस्तरावरील वित्तसंस्था स्थापल्या आणि थकबाकीदार गरीब-अविकसित राष्ट्रांना आपल्या प्रभावाखाली घेऊन त्यांच्या देशात मुक्तबाजारपेठा हस्तगत केल्या. अशा

E- ISSN 2582-5429

AMRJ

*Akshara Multidisciplinary Research Journal*

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

January-March 2024 Volume 04 Issue V (A) SJIF Impact- 5.67

परस्परांच्या गरजपूर्तीच्या आणि संबंधाच्या दृष्टिकोनातून संपूर्ण जग हे एक खेडे बनले आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया घडून आली.

''भारतातही १९९० नंतर खुले आर्थिक धोरण स्वीकारले गेले आणि जागतिकीकरणात भारत गोवला गेला त्याचे एकमेव कारण म्हणजे भारताचे कर्जबाजारीपण होय. १९८० साली भारताने नाणेनिधी कडून ५०० कोटी डॉलरचे कर्ज घेतले होते, पण ते फेडता आले नाही, म्हणून नाणेनिधीच्या सांगण्यावरून भारताने आंतरराष्ट्रीय व्यापाराला व खाजगी भांडवलाला वाव दिला. तर १९९० साली भारताने उद्योगाच्या पुन:र्रचनेचे धोरण स्वीकारले. कारण कर्जासाठी जागतिक बँकेला शरण जाऊन तिच्या सर्व अटी भारताला मान्य कराव्या लागल्या.'' [५] त्याचा परिणाम ग्रामीण समाजातील शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी आणि दुर्बल घटकांवर झाला. शेतीविषयक अनुदानात कपात झाल्याने खताच्या किंमती वाढल्या. परदेशी मालाच्या आयातीवरील कर कमी केल्याने गरज नसतांना तेल, कापूस, साखर, केळी, गहू आणि इतर मालाची आवक वाढली आणि देशी मालाच्या किंमती कमी झाल्या. शेतकऱ्यांच्या मालास रास्त भाव मिळत नाही म्हणून तो कर्जबाजारी होऊन सावकारी पाशात अडकला. सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण केल्याने आरक्षण आणि नोकरीच्या संधी कमी होऊन बेरोजगारी वाढली. ग्रामीण उद्योगधंदे उभे करता आले नाहीत म्हणून गरीब अधिक गरीब बनले. आपल्या देशात बड्या राष्ट्रांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची अनिर्बंध सत्ता असल्याने कर्जबाजारी सरकारनेही जनतेला वाऱ्यावर सोडले आणि बहुजन समाजाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्याचे कारण म्हणजे ''सरकारने कराच्या रूपाने पैसा गोळा करून तो अनुदानाच्या रूपाने समाजासाठी उधळणे चूक आहे, हा विचार बळावत चालला. कल्याणकारी राज्याची कल्पना लयास गेली. समाजाच्या कल्याणासाठी सरकारने योजना राबविणे कालबाह्य ठरले. याउलट समाजाने, त्यातील विविध घटकांनी व त्यातील व्यक्तींनी स्वत:चा विकास स्वत: साधावा विकास साधण्याची जबाबदारी ज्याची त्याची स्वत:ची आहे, सरकारची नव्हे. असे सांगितले जाऊ लागले'' [६].

यातून सरकार तर मुक्त झाले, पण ग्रामीण जनतेचे भयंकर हाल होऊ लागले. कारण जागतिकीकरण हे शहरकेंद्री आहे. त्यात ग्रामीणाचे हित नाही. प्रसारमाध्यमेही त्यांची दखल घेत नाहीत, म्हणून त्यांचे प्रश्न व सुख-दु:ख याचे प्रतिबिंब त्यात उमटलेले दिसत नाही. उलट उच्चभ्रूंच्या चंगळवादाचे आदर्श त्यांच्यासमोर ठेवले जात आहेत. त्याचबरोबर शेती आणि ग्रामीण रोजगार याची हमी सरकार घेत नाही. हमीभाव आणि संबंधित यंत्रणा यात शेतकरी नागवला जात आहे. वीजटंचाई, पाणीटंचाई याचा सर्वात जास्त फटका ग्रामीण माणसांना बसतो आहे. औषधाच्या भरमसाठ किंमती वाढल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. शिक्षणातील अनुदान कपात झाल्याने गरिबांच्या मुलांना उच्चशिक्षण घेता येत नाही. गुणवत्तेच्या नावाखाली चांगल्या शिक्षणक्षेत्रात व व्यावसायिक शिक्षणक्रमाला प्रवेश मिळत नाही. अर्थात मानवी जीवनाच्या मुलभूत सुविधांवरच जागतिकीकरणाने घाव घातल्याने ग्रामीणांच्या अस्तित्वाचा आणि त्यांच्या जीवनमानाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशाप्रकारची परिस्थिती आज जागतिकीकरणामुळे निर्माण झाली आहे.

**जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव**

जागतिकीकरणाचा प्रभाव आज समाजातील प्रत्येक क्षेत्रावर पडलेला दिसून येत आहे. याला साहित्य हे सुध्दा अपवाद नाही. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते. त्याचप्रमाणे साहित्याचाही परिणाम समाजावर होत असतो. समाजातील घटना, प्रसंग, समस्या, प्रश्न, सुख: दु:ख, सणवार, उत्सव, रीती-रिवाज, परंपरा इत्यादीचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते.

| १ | आदिवासी स्त्रियांची जीवनपद्धती व मानवी मूल्य ओपासना<br>प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे | १-६ |
| २ | बंजारा जमात आणि त्यांची लोकगीते<br>अमोल अमरसिंग चव्हाण | ७-११ |
| ३ | भारतीय चित्रपट संगीत प्रचाराचे एक प्रभावी माध्यम-आकाशवाणी<br>प्रा. डॉ. जगन्नाथ खै. इंगोले | १२-१३ |
| ४ | शास्त्रीय संगीताच्या प्रचाराकरिता प्रसार माध्यमाची विशेष भुमिका<br>गजानन बाळासाहेब काळे | १४-१७ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील प्रासंगिकता<br>प्रा. विजया ना. शिरसाट | १८-२२ |
| ६ | मराठा समाजातील महिलांची सद्यस्थिती व परिवर्तन<br>डॉ. सुनिता तुकारात राठोड (गोरे) | २३-२७ |
| ७ | संगीतातील संशोधन पद्धती<br>डॉ. नेत्रा श्रीकांत तेल्हारकार | २८-३१ |
| ८ | संगितिक वाटचालीत प्रसार माध्यमाची भूमिका<br>सहा. प्रा. अमोल दशरथ वाडवे | ३२-३४ |
| ९ | पालि साहित्यातील जातक कथांचे महत्त्व<br>सुरेखा प्रल्हादराव तायडे<br>प्रा. डॉ. चिंचोलीकर अश्वनीकुमार नामदेवराव | ३५-३९ |
| १० | कव्वाली या गीत प्रकाराचा उगम विकास व वाटचाल<br>श्री. प्रशांत डी. राजवर्धन<br>डॉ. राजीव बोरकर | ४०-४५ |
| ११ | बंदिश - शास्त्रीय संगीतातील अमुल्य ठेवा<br>श्री. राजू लक्ष्मणराव सरकटे<br>डॉ. राजीव बोरकर | ४६-४८ |
| १२ | उच्च शिक्षणात प्रदर्शन कलांचा महत्व<br>भाग्यरेखा रामरावजी नागमोते (कोंढ़ा)<br>डॉ. अनिल दडमल | ४९-५२ |

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 5

# ८. संगितीक वाटचालीत प्रसार माध्यमाची भूमिका

सहा. प्रा. अमोल दशरथ वाडवे
संगीत विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**सारांश**

संगीत ही मानवाला निसर्गाने दिलेली अमूल्य देणगी आहे. मानवाला शारीरीक तसेच मानसिक विकासाकरीता प्राचिन काळापासनच संगीत हे महत्वपूर्ण ठरते. संगीत तज्ञानुसार मनुष्याच्या हृदयातील ठोके, नाडीचे स्पंदना मध्ये सुध्दा एक प्रकारे लय असते त्यानुसार मानवी शरीर हे संपूर्ण संगीतमयच आहे. मानवी जीवनात प्रत्येक कलेचे एक महत्वपूर्ण स्थान असते. संगीत कला ही सर्व श्रेष्ठ कला मानल्या जाते, गायन, वादन, नर्तन या तीन कलांचा समूह म्हणजे संगीत होय.

भारतीय संगीत हे समृध्दतेने नटलेले संगीत आहे. यामध्ये लोकगीत, सुगमसंगीत, शास्त्रीय संगीत असे अनेक प्रकार संगीताचे पहावयास मिळतात. या सर्व संगित क्षेत्रातील वाटचालीस प्रसार माध्यमाद्वारे जनसामान्य पर्यंत पोहचवू शकलो यात मात्र शंका नाही. संगीत सामान्यान पर्यंत पहचवण्याचे सक्षम माध्यम म्हणजे प्रसारमाध्यम आहे. जे त्याच्या उत्क्रांती पासून तर आज पावेतो कार्य करीतच आहे. देशाच्या जडणघडणीत जसे माध्यमे सक्षम कार्य करतात त्याचप्रमाणे संगीत घराघरात पोहचवण्याचे महान कार्य प्रसार माध्यमाद्वारे (मिडीया) झालेले आहे. वर्तमान युगात जनसामान्याच्या जवळ आपले आचार विचार, कला,संस्कृती,घडामोडी पोहचवण्या करीता प्रचार माध्यम एक दुवा आहे. प्रसार माध्यमांना आपण लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ मानतो. या आधार स्तंभाने जनसामान्यांच्या समस्ये बरोबरच कलेचे संवर्धन ही प्रसार माध्यमांव्दारे झालेले आपणास पहावयास मिळते.

**प्रस्तावना**

जागतिकीकरणाच्या वर्तमान परिदृश्यात प्रसार माध्यमाचे बदलते स्वरूप व स्थान महत्वपूर्ण ठरते. आज प्रसारमाध्यमांचा कायापालट झालेला असून पारंपारिक माध्यमांसह अत्याधुनिक माध्यमानी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पदार्पण केलेले आहे. आकार व दिशा देण्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण राहीलेली आहे. पूर्वीच्या काळातील आकाशवाणी, दूरदर्शन, रेडिओ, ग्रामोफोन, रेकार्ड इत्यादी प्रसार माध्यमे अस्तित्वात होती त्याचे वर्तमानात स्वरूप जरी बदलले असले तरी प्रसारमाध्यमाचे कार्य अविरत सुरू आहे. चित्रपट संगीत, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, नाटयगीत, गझल, भावगीत, लोकगीत अशा अनेक संगीताचा प्रचार प्रसार हे करीत असते. प्रसार माध्यमांव्दारे विविध प्रांतातील वेगवेगळया बोलीतील गायन वादनाचे कार्यक्रम राबविल्या जातात. त्यामुळे जनसामान्यात त्याची आवड निर्माण होत असते. विविध भारती, बिना का गीत माला या सारखे रेडीओवर येणारे कितीतरी कार्यक्रम जनसामान्याचे मनोरंजन करीत असतात. ज्या प्रमाणे संगीत हे मनुष्य जीवनाला सुगंधित करते तो कलाकार एक प्रकारे सांगितीक समाजकार्यच करीत असतो.

विसाव्या शतकामध्ये आकाशवाणी त्यानंतर दुरदर्शन हे दोन महत्वाचे तांत्रिक शोध लागले व ज्ञानमाहिती मनोरंजनाच्या क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडून आली. आकाशवाणी वरून ज्ञान, माहिती, मनोरंजन, प्रबोधन या सोबतच शैक्षणिक पाठावर आधारित कार्यक्रमाचे ही प्रसारण शालेय विद्यार्थ्याकरीता करण्यात येवू लागले. नविन गायक वादक यांचे ही कार्यक्रम प्रसारित होत असत. त्यामुळे समाजाला अभिजात संगीताची जाण होऊ लागली. कधीही न ऐकलेले संगीत प्रसार माध्यमामुळे ऐकायला मिळाले जनसामान्यात संगीत कले विषयी आवड निर्माण होण्यास मदत झाली.

अतिप्राचिन काळापासून भारतीय संगीत अस्तित्वात आहे. संगीत कलेला सर्वश्रेष्ठ कलेचा दर्जा देवून भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक म्हटल्या गेले आहे. कलेने भारतीय समाजात संस्कृती जोपासण्याचे कार्य केले आहे. निसर्ग निर्मीत संगीत समयानुरूप बदलत दरबाराची शोभा वाढवणारे संगीत २० व्या शतकात हळूहळू विज्ञानाच्या युगात नविन आविष्कारसह जनसामान्यात प्रचलित होत गेले. यामागे विशेष कार्य विज्ञान युगातील प्रसार माध्यमे आकाशवाणी, दुरदर्शन रेडीओ केंद्र ही आहेत.

भारतीय शास्त्रीय संगीत १६३८-३९ दरम्यान प्रख्यात कलाकार फैयाज खान, ओंकारनाथ ठाकुर, हिराबाई बडोदेकर, बडे गुलाम अली खान, गंगुबाई हंगल, बेगम अख्तर, यांचे रेडीओ या प्रसार माध्यमाद्वारे अनेक संगीत मैफिलीचा आनंद जनसामान्यापर्यंत पोहचला होता. भारतामध्ये सर्व प्रथम संगीत कलाकारांना आकाशवाणीने मंच प्रदान केला. त्यामध्ये शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, लोकगीत यात वर्गवारी करून त्याचे ध्वनिपरिक्षण केले गेले व त्यानुसार त्यांना कार्यक्रमाकरीता आमंत्रित केले गेले. यात राजकीय पक्षाचे प्रचार होत गेले सोबतच जनसामान्याचे मनोरंजनासाठी खूप मोठे माध्यम मिळाले. कलाकारांच्या कले प्रति आगळा आंनद मिळाला. हळूहळू आकाशवाणीचा विस्तार होत गेला व क्षेत्रीय कलाकारांचा सहभाग कलाप्रदर्शनासाठी होत असत. पुढे अखिल भारतीय संगीत कार्यक्रमात चित्रपट संगीत वादयवृंद, गीतनाटय या सारखे कार्यक्रमांना श्रोत्यांचा प्रंचड प्रतिसाद मिळाल्यामुळे आकाशवाणी लोकप्रियतेकडे वाटचाल करू लागली या प्रसार माध्यमामुळे अनेक कलाकार आपली कला प्रदर्शित करू लागले.

प्रसार माध्यमात सिनेमाजगात सुध्दा अनेक कलाकारांना कला सादरीकरणाकरीता मंच प्राप्त झाला. संगीत निर्माण करणारे संगीतकार यांची संख्या वाढू लागली. वेगवेगळ्या प्रांतातुन जे संगीत निर्देशक आले त्यांनी आपल्या घराने आणि क्षेत्रातील संगीताच्या धुनातून सिनेमा जगात नविन लोकप्रिय असे गीत रचना स्वर रचना निर्माण केल्या. त्यामुळे सिनेसंगीत समृध्द होत गेले. बालवयातील मुले सुध्दा आपल्या गल्लीत गाणे गात असत.

एच.एम.व्ही., ट्विन् कोलम्बिया, हिंदुस्थान आणि यंग इंडिया कंपनी चे डिस्क रिकार्ड या काळात लाखोच्या संख्येने विकल्या गेली. धृपद, धमार, तराणा, भजन, गझल, दादरा आणि लोकगिते फिल्मी दुनियेत आल्यावर त्याच्या प्रसाराने जनसामान्याच्या आनंदाला सीमा राहत नसे. सिनेमा, संगीतकला, अभिनय कला अनेक अशा कला प्रसार माध्यमामुळे विकसित झाल्या.

गायकांन सोबतच संगीत दिग्दर्शक ची ही संख्या वाढु लागली. गुलाम मुहम्मद, एस.एन. त्रिपाठी, सरस्वती देवी, कृष्णराव चोणकर, आर.सी मदन मोहन. सलिल चौधरी, सी.रामचंद्र, हुस्नलाल भगतराम, शिवराम, ओ.पी. नयर तिमिर बरन, शंकर जयकिसन, वसन्त देसाई, कल्याणजी-आनंदजी,लक्ष्मीकांत प्यारेलाल, आर.डी.बर्मन अशी अनेक संगीत निर्देशके आपल्या दिग्दर्शनाच्या प्रचार प्रसारामुळे नावलौकीकास अजरामर आहेत. यामध्ये प्रसार माध्यमाची विशेष भूमिका आपल्याला दिसून येते.

जनसामान्यात सांस्कृतीक चेतना उत्पन्न झाली तेव्हाच संगीत साहित्य अन्य कलेचा चार ही अंगाने विकास होत गेला. त्याच काळात दूरदर्शनचा प्रभाव जनसामान्यात पडला. ज्या कलाकारांना नुसते कानाने ऐकत होते ते आता प्रत्यक्षात दिसु लागले. गायन, वादना व्यतिरिक्त नर्तनाचे कलाकार सुध्दा पहावयास मिळत होते. संगीत कार्यक्रमा व्यतिरिक्त संगीत आणि नृत्याचे धडे, संगीत पत्रिका,संगीत परिसंवाद संगीत प्रतियोगिता राष्ट्रीय वादवृन्द , पाश्चात्य संगीत, वृन्दगान, चित्रपट संगीत तसेच भारतीय प्रवाशांकरिता विविध रंगीबेरंगी कार्यक्रमाने श्रोत्याचे आणि जनसामान्याचे मनाला मोहणारे कला प्रदर्शन दुरदर्शन व्दारे प्रसारीत होत असत. या प्रसार माध्यमामुळे महान संगीतकार व त्यांच्या संबधित वृत्तचित्र आणि नाटक ही प्रदर्शीत होत गेले.

आकाशवाणी प्रसार माध्यमाने ९१ प्रसारण केंद्र आणि दुरदर्शन चे अनेक केंद्राने मानव समाजाला मनोरंजन देण्याचा प्रयत्न केला. यामुळे सांगितिक वाटचालीत सुध्दा प्रसार माध्यमे अत्यंत उपयुक्त ठरली. आज आधुनिक तंत्रज्ञानाने प्रगती करीत असताना मनोरंजन प्रसार माध्यमांचे बऱ्याच प्रमाणात अविरत कार्य सुरूच आहे, व राहील.

**निष्कर्ष**

भारतीय संस्कृती जोपासण्याचे काम ही कला करीत असते. कलेला जनसामान्या पर्यंत पोहचविणे गरजेचे असते प्रसार माध्यमांनी कलेस जनसामान्यापर्यंत पोहचवून मानव समाजाला दिलेला मनोरंजनाचा अमुल्य ठेवा आहे. मानव जिवनात कलेचे महत्वपूर्ण स्थान असते. भारतीय संगीत समृध्दतेने नटलेले आहे. परंतु प्रसार आणि प्रचार करण्याची साधने नसती तर कदाचित विशिष्ट समूह, विशिष्ट घराने, विशिष्ट क्षेत्रापूरते मर्यादित राहीले असते. आज प्रसार माध्यमामुळे सामाजिक आचार विचार सोबतच कलेचीही देवाण घेवाण होते.

**संदर्भ**


१. मुलर लिवा स्थापित लोकशाहीत मास मिडीयाची तुलना

२. शास्त्रीय संगीत शिक्षत-समस्याक एवं समाधान, संपादक डॉ. अलकनंदा पाळनीटकर

३. कला संगम खण्ड-१, लेखक अजय देशपांडे, सई देशपांडे, प्रकाशक गांधी नगर नागपूर प्रथम प्रकाशक १० फेब्रु २०१८

४. 'बसंत' संगीत विशारद, डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग संगीत कार्यालय हाथरस (उ.प्र)

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - XII Issue - II March - August - 2024

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 47026

Single Blind Review/Double Blind Review

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.537
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आदिवासी स्त्रियांची जीवनपद्धती व मानवी मूल्य जोपासना<br>**प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे** | १-६ |
| २ | बंजारा जमात आणि त्यांची लोकगीते<br>**अमोल अमरसिंग चव्हाण** | ७-११ |
| ३ | भारतीय चित्रपट संगीत प्रचाराचे एक प्रभावी माध्यम-आकाशवाणी<br>**प्रा. डॉ. जगन्नाथ खै. इंगोले** | १२-१३ |
| ४ | शास्त्रीय संगीताच्या प्रचाराकरिता प्रसार माध्यमाची विशेष भुमिका<br>**गजानन बाळासाहेब काळे** | १४-१७ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील प्रासंगिकता<br>**प्रा. विजया ना. शिरसाट** | १८-२२ |
| ६ | मराठा समाजातील महिलांची सद्यस्थिती व परिवर्तन<br>**डॉ. सुनिता तुकारात राठोड (गोरे)** | २३-२७ |
| ७ | संगीतातील संशोधन पद्धती<br>**डॉ. नेत्रा श्रीकांत तेल्हारकार** | २८-३१ |
| ८ | संगितीक वाटचालीत प्रसार माध्यमाची भूमिका<br>**सहा. प्रा. अमोल दशरथ वाडवे** | ३२-३४ |
| ९ | पालि साहित्यातील जातक कथांचे महत्त्व<br>**सुरेखा प्रल्हादराव तायडे**<br>**प्रा. डॉ. चिंचोलीकर अश्वनीकुमार नामदेवराव** | ३५-३९ |
| १० | कव्वाली या गीत प्रकाराचा उगम विकास व वाटचाल<br>**श्री. प्रशांत डी. राजवर्धन**<br>**डॉ. राजीव बोरकर** | ४०-४५ |
| ११ | बंदिश - शास्त्रीय संगीतातील अमुल्य ठेवा<br>**श्री. राजू लक्ष्मणराव सरकटे**<br>**डॉ. राजीव बोरकर** | ४६-४८ |
| १२ | उच्च शिक्षणात प्रदर्शन कलांचा महत्व<br>**भाग्यरेखा रामरावजी नागमोते (कोंड्रा)**<br>**डॉ. अनिल दडमल** | ४९-५२ |

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 5

# ३. भारतीय चित्रपट संगीत प्रचाराचे एक प्रभावी माध्यम-आकाशवाणी

प्रा. डॉ. जगन्नाथ खी. इंगोले
संगीत विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**सारांश**

भारतीय लोकांना आनंद देण्याचे महान कार्य आकाशवाणी या प्रसार माध्यमाने केले. भारतात इ.स.1923 मध्ये काही शहरात आकाशवाणी प्रसार माध्यमाचे कार्य सुरू होवून, इ.स. 1936 मध्ये ऑल इंडिया रेडिओची स्थापना करण्यात आली. संपूर्ण भरतात आकाशवाणीच्या नऊ केंद्राद्वारे विविध प्रसारणाचे कार्य होऊ लागले. इस. 1936-37 नंतर आकाशवाणीने विविध भाषांचे प्रसारण सुरू करून, भारतात एक मोठे जाळे विनले होते. देशातील व देशाबाहेरील राजकीय, सामाजिक आर्थीक घडामोडींचे प्रसारण लोकांपर्यंत पोहचविण्याचे एक प्रबळ माध्यम आकाशवाणी ठरले होते.

"भारतीय लोकांकडे मनोरंजनाचे कोणतेही साधन नव्हते, त्यामुळे संगीत कलेचा चाहता वर्ग सहजपणे रेडिओ 'सिलोन' द्वारा प्रसारीत कार्यक्रमाकडे आकर्षित झाला होता." (3) प्रत्येक भारतीय आपल्या व्यस्त जीवनातील वेळ काढून रेडिओवर प्रसारित होणारे कार्यक्रम ऐकत होता. हा कालखंड आकाशवाणी प्रसार माध्यमांद्वारे भारतीय लोकांना प्रचंड प्रभावित करणारा ठरतो.

प्रस्तावनाः

भारतीय लोकांना आनंद देण्याचे महान कार्य आकाशवाणी या प्रसार माध्यमाने केले. भारतात इ.स. 1923 मध्ये काही शहरात आकाशवाणी प्रसार माध्यमाचे कार्य सुरू होवून, इ.स. 1936 मध्ये ऑल इंडिया रेडिओची स्थापना करण्यात आली. संपूर्ण भरतात आकाशवाणीच्या नऊ केंद्राद्वारे विविध प्रसारणाचे कार्य होऊ लागले. इस. 1936-37 नंतर आकाशवाणीने विविध भाषांचे प्रसारण सुरू करून, भारतात एक मोठे जाळे विनले होते. देशातील व देशाबाहेरील राजकीय, सामाजिक आर्थीक घडामोडींचे प्रसारण लोकांपर्यंत पोहचविण्याचे एक प्रबळ माध्यम आकाशवाणी ठरले होते. देशातील नामवंत कलावंतच्या मैफली आकाशवाणीद्वारे प्रसारीत होत होत्या. अनेक नामवंत कलाकारांनी आपल्या व्यावसायिक जीवनाची सुरूवात या माध्यमाद्वारे केली. त्यात संगीतकार रोशन, मदन मोहन, पार्श्वगायक मोहम्मद रफी, तलत महमुद इत्यादी कलावंतांचा समावेश आहे.

इ.स. 1949 हे वर्ष 'आकाशवाणी' साठी अत्यंत महत्वाचे ठरले कारण या वर्षी आकाशवाणी 'सिलोन' केंद्राद्वारे सर्वात अधिक 78 आर.पी.एम. रिकॉर्डस संग्रही करून लोकांसाठी मनोरंजनाचे मोठी दालण उघडले. इ.स. 1952 साली आकाशवाणी केंद्र 'सिलोन' द्वारा प्रसारीत होणारा "बिनाका गीत माला" हा इतिहासातील पहिला प्रयोजित कार्यक्रम होता. "हा कार्यक्रम भारतीय चित्रपटाच्या इतीहासातील एक क्रातीकारी कार्यक्रम होय." (1) त्यामुळेच या कालखंडात "रेडिओ सिलोन भारतीय कला जीवनासाठी नव्हे तर दैनंदिन जीवनणाचे अविभाज्य अंग बनले होते."(2)

"भारतीय लोकांकडे मनोरंजनाचे कोणतेही साधन नव्हते, त्यामुळे संगीत कलेचा चाहता वर्ग सहजपणे रेडिओ 'सिलोन' द्वारा प्रसारीत कार्यक्रमाकडे आकर्षित झाला होता." (3) प्रत्येक भारतीय आपल्या व्यस्त जीवनातील वेळ काढून रेडिओवर प्रसारित होणारे

कार्यक्रम ऐकत होता. हा कालखंड आकाशवाणी प्रसार माध्यमांद्वारे भारतीय लोकांना प्रचंड प्रभावित करणारा ठरतो. या काळात भारतीय समाजात 'रेडीओ' अत्यंत महत्वाचे व प्रतिष्ठेचे साधन मानले जात होते. ''भारतीयांना एका वेळेचे जेवन नसले तरी फारसा फरक पडत नव्हता परंतु रेडिओ वर प्रसारीत कार्यक्रम न ऐकणे त्याला मान्य नव्हते.'' (4) 'सिलोन' या वाहीनी द्वारे प्रसारीत ''बिनाका गीत माला'' या कार्यक्रमाने भारतीय समाजाला वेड लावले होते. या कार्यक्रमाचे उद्घोषक 'अमीत सयानी' यांच्या भारदस्त (आकर्षक) आवाजने या कार्यक्रमाला अधिक लोकप्रियता मिळवून दिली. त्यांच्या बाहेर पडणारा मुखातून 'बहनो और भाईयो' हा शब्द प्रयोग ऐकण्यासाठी रसिक आतुर होत असते. या कार्यक्रमाचा प्रचंड प्रभाव भारतीय संगीत रसीकावर झाला होता. त्यामुळेच 'सिलोन' या आकाशवाणी केंद्राची लोकप्रियता अधिक वाढली होती. हीच लोकप्रियता आपल्या वाट्याला यावी म्हणून विविध भारती या वाहिनीने 'संगीत सरिता' या कार्यक्रमाचे प्रसारण सुरू केले होते. परंतु त्याला ''बिनाका गीत माला''या कार्यक्रमाएवढी लोकप्रियता प्राप्त होऊ शकली नाही. हा संपूर्ण कालखंड आकाशवाणी प्रसार माध्यमाच्या प्रभावाचा काळ होता. त्याकाळात विविध केंद्राद्वारे हिंदी चित्रपट गीताचे वेगवेगळे कार्यक्रमाचे प्रसारण होत होते. त्यात ''हमेशा जवा'', आवाज दे कहाँ है, तामील-ए-इरशाद इत्यादी कार्यक्रमाचा समावेश होता. आकाशवाणी व्दारे प्रसारीत अशा विविध कार्यक्रमातून हिंदी चित्रपट संगीताचा चाहता वर्ग मोठया प्रमाणावर निर्माण झाला. या कार्यक्रमापासून लोकांना गायक संगीतकार गीतकारांची ओळख होवून चित्रपट गितांची आवड निर्माण करण्यास महत्वाचे कार्य ठरले.

भारतीय संगीताला लोकापर्यंत पोहचवून त्यांची रुची अधिक प्रमाणात वाढवण्याचे मोठे कार्य आकाशवाणी व्दारे झाले.

**निष्कर्ष**

मार्गील काळात भारतीय चित्रपट संगीताला विविध कार्यक्रमाव्दारे प्रसारित करून, चित्रपट संगीत अधिक लोकप्रिय करण्यासाठी आकाशवाणी एक प्रभावी माध्यम होते.

**संदर्भ**

१. कला संगम खंड I, अजय देशपांडे, सई देशपांडे गांधी नगर नागपूर, प्रकाशक, सई देशपांडे गांधी नगर नागपूर

२. संगीत विशारद वसंत हातरस प्रकाशराव, उ. प्रदेश

३. https: //www.bbc.com artictes

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

SUSTAINABLE DEVELOPMENT : IMPLEMENTATION IN HUMAN DEVELOPMENT

October -2023

ISSUE No- (CDXXX) 430



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editors

Dr. Sunil Akhare
Principal
Arts & Science College
Kurha, Dist. Amravati

Dr. Ajay Solanke
Principal
Shivramji Moghe Arts, Commerce and Science College
Tq. Kelapur, Dist. Yavatmal.

Dr. Anil Korpenwar
Principal
Rajiv Vidnyan
Va Vanijya Mahavidhyalay,
Zari-Jamni Dist. Yavatmal

Dr. Nitin Singhavi
I/C. Principal
Sardar Patel
Arts and Commerce College,
Mohada, Tq. Kelapur, Yavatmal.

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor - (SJIF) -8.632 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## October -2023

ISSUE No - (CDXXX) 430

## SUSTAINABLE DEVELOPMENT : IMPLEMENTATION IN HUMAN DEVELOPMENT

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Editors**

**Dr. Sunil Akhare**
Principal
Arts & Science College, Kur
ha, Dist. Amrava

**Dr. Ajay Solanke**
Principal
Shivramji Moghe Arts, Commerce and Science College,
Tq. Kelapur, Dist. Yavatmal.

**Dr. Anil Korpenwar**
Principal
Rajiv Vidnyan
Va Vanijya Mahavidhyalay,
Zari-Jamni Dist. Yavatmal

**Dr. Nitin Singhavi**
I/C Principal
Sardar Patel Arts and Commerce College,
Mohada, Tq. Kelapur, Yavatmal.

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632 ISSUE No - (CDXXX) 430
ISSN : 2278-9308
Octember, 2023

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Environmental Hazards Caused By Mining **Dr. Omprakash B. Munde** | 1 |
| 2 | A study on impact of Education in Promoting Sustainable Development of Human **Dr. J. D. Gupta** | 5 |
| 3 | Environmental Monitoring and Metal Oxide Semiconductors Gas Sensors. **Suyog Surendra Mankar** | 10 |
| 4 | Knowledge Gaps in Mathematical Models for Sustainable Development: Bridging Theory and Practice **Sandip Madhavrao Pawar** | 14 |
| 5 | Harnessing the Power of Physics for Sustainable Development: Recent Advances and Future Prospects **Pragati K. Tale** | 18 |
| 6 | Physical Fitness And Psychology Of An Old Age People **Mr. Sunil G. Dhakulkar** | 22 |
| 7 | Meditation And Yoga: A Healthy Way Of Living **Prof. Sachin J. Kokode** | 25 |
| 8 | Bridging the Gap: Unravelling the Enigmatic Realm of Traditional Health Care Systems **Vikas Manohar Kothare** | 29 |
| 9 | Importance Of Sustainable Development In Future **Dr. Pawan Kumar Gupta** | 32 |
| 10 | Assessing the Impact of Dimethoate and Chlorpyrifos Pesticides on Chlorophyll Content of Vicia faba L. **Santosh G. Atram** | 37 |
| 11 | A Comparative Analysis of Emotional Intelligence VariationAcross Combative Players **Dr. Khushal J. Alaspure** | 40 |
| 12 | Agri-Tourism Development in Maharastra **Prof. Abhijit Prabhakar Dod ,Dr. Sunil B. Akhare** | 47 |
| 13 | २०२३ मधील नैसर्गिक आपत्त्याचे भौगोलीक अध्ययन प्रा. डॉ. विजय के. टोम्पे प्रा. डॉ. सचिन एन. भोंबे, | 50 |
| 14 | कृषीच्या शाश्वत विकासासाठी मृदा आणि जलसंधारणाची आवश्यकता **प्रा. डॉ. दीपक उदयराज अंबोरे** | 54 |
| 15 | अडाण नदी खोऱ्यातील आठवडी बाजार केंद्राची वैशिष्ठ्ये डॉ. तिलकचंद जि. धोटे प्रा. कुणाल अनिलराव झोटींग | 59 |
| 16 | आदिवासी समुदाय का पर्यावरण संरक्षण में योगदान डॉ. संगीता भांगडिया मालाणी | 65 |
| 17 | Effect Of Biorhythms On Positive Mental Health Of Athletics Track Event Players Retired From Competitive Arena **Mr. Nilesh S. Ingole** | 70 |
| 18 | Optimizing Resource Allocation for Sustainable Development: A Mathematical Modelling Approach **Kunal Singh Manoj Singh Kale** | 73 |
| 19 | Global Warming and Sustainability: Understanding the Beliefs of Marketing Faculty **Chetan Harishchandra Rathod** | 77 |
| 20 | A Primary Study on the Role of Sustainable Tourism in Socio- Economic Development in Birbhum District of West Bengal **Sandipan Ganguly, Dr. Sunil B. Akhare** | 82 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632 ISSUE No - (CDXXX) 430

ISSN : 2278-9308
Octember, 2023

# कृषीच्या शाश्वत विकासासाठी मृदा आणि जलसंधारणाची आवश्यकता

प्रा. डॉ. दीपक उदयराज अंबोरे
सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती – ४४४६०५
मोबाईल क्र – ९७३०१९८६७८, इमेल – deepakambore710@gmail.com

**सारांश**

सतत वाढणारी लोकसंख्या आणि बदलत्या हवामानामुळे प्रचंड दबावाखाली या ग्रहावर मर्यादित नैसर्गिक संसाधने उपलब्ध आहेत. मृदा आणि पाणी हे कृषी उत्पादन प्रणालीसाठी मूलभूत नैसर्गिक संसाधने आहेत. मानववंशजन्य आणि प्रतिकूल नैसर्गिक क्रियाकलाप हे नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासाचे प्रमुख घटक आहेत. विविध ऱ्हास प्रक्रियांपैकी, मृदेची धूप हा मृदा आणि जलस्रोतांच्या ऱ्हासासाठी एक गंभीर धोका आहे. भारतात, पाण्याच्या धूप प्रक्रियेमुळे एकूण भूभागापैकी सुमारे ६८.४०% जमीन खराब झाली आहे.

मृदा आणि पाण्याचे ऱ्हास होण्यापासून संरक्षण करण्यासाठी सुधारित तंत्रज्ञानाचा विकास आणि अवलंब, नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर आणि प्रभावी व्यवस्थापन पद्धती ही काळाची गरज आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात शेतीसाठी मृदा आणि जल यांच्या संधारणा संदर्भात चर्चा करण्यात आलेली आहे.

**बीजसंज्ञा**

कृषी, शाश्वत विकास, मृदा, जल, संधारण

**प्रस्तावना**

सर्व सजीव जीवनाच्या अस्तित्वासाठी आणि जगण्यासाठी मृदा आणि पाणी अपरिहार्य आहेत. मानवाच्या अन्न, खाद्य, इंधन आणि पोषणासाठी आवश्यक असलेली ही मूलभूत संसाधने आहेत. मृदा त्यांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी एक माध्यम प्रदान करून वनस्पतींच्या जीवनास आधार देते. हे नूतनीकरण न करता येणारे नैसर्गिक संसाधन आहे आणि विविध प्रकारच्या क्षरण प्रक्रियेद्वारे जलद ऱ्हासास संवेदनाक्षम आहे. जगभरात, एकूण उत्पादक जमिनीपैकी सुमारे ५२% जमीन विविध प्रकारच्या ऱ्हास प्रक्रियेमुळे खराब झाली आहे आणि जवळजवळ ८०% भूभाग पाण्याच्या धूपाने प्रभावित आहे.

कृषीच्या विकासासाठी मृदा आणि जल यांचे व्यस्थापन आणि त्यांचा ऱ्हास थांबविणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनात कृषीच्या शाश्वत विकासा संदर्भात याविषयी चर्चा करण्यात आलेली आहे.

**उद्दिष्ठे**

कृषीच्या शाश्वत विकासासाठी मृदा आणि जलसंधारणाची आवश्यकता सांगून त्यविषयी उपाययोजना सुचविणे हे प्रस्तुत अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ठे आहे.

**माहीती स्त्रोत व अभ्यास पद्धती**

प्रस्तुत अभ्यासासाठी उपयोगात आलेली माहिती ही द्वितीय स्त्रोतावर आधारित आहे. प्रस्तुत माहिती ही पूर्वप्रकाशित साहित्य, संशोधन अहवाल, लेख, वर्तमान पत्र तसेच इंटरनेट वरील माहिती याद्वारे संकलित केलेली आहे.

संकलित केलेली माहिती ही योग्य पद्धतीने मांडून त्याचे आकलन करून स्वताच्या शब्दात पुन:रचना करून लिखाण करण्या आले आहे. तसेच कृषीच्या शाश्वत विकासासाठी मृदा आणि जल संधारण यासाठी उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहे.

**जमिनीच्या ऱ्हासाची व्याप्ती**

जागतिक स्तरावर, जमिनीचा वापर आणि व्यवस्थापन पद्धतींमधील बदलांमुळे मृदेची धूप वाढली आहे आणि त्यामुळे जमिनीचा अपरिवर्तनीय ऱ्हास झाला. ज्यामुळे पृथ्वीच्या २३.५% भूभागावर याचा परिणाम झाला आहे. मृदेची धूप ही एक गंभीर समस्या आहे जी केवळ जमीन आणि जलस्रोतांची गुणवत्ता खराब करत नाही तर कृषी उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीला देखील हानी पोहोचवते. भारतात, विविध संस्थांनी जमिनीच्या ऱ्हासाच्या प्रमाणात अंदाज लावला आहे. NBSS आणि LUP बद्दल भारतात १४६.८ mha निकृष्ट जमीन क्षेत्र नोंदवले गेले आहे.

पुढील सारणी क्रमांक १ मध्ये भारतातील विविध संस्थांनी मृदेची धूप झाली आहे, त्याचा अंदाज दर्शविलेला आहे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632 ISSUE No - (CDXXX) 430
ISSN : 2278-9308
Octember, 2023

सारणी क्रमांक १
मृदा धूप संदर्भात भारतातील विविध संस्थांचा अंदाज

| एजन्सी | अंदाज वर्ष | निकृष्ट क्षेत्र Million Hector (mha) |
|---|---|---|
| राष्ट्रीय कृषी आयोग | १९७६ | १४८ |
| कृषी मंत्रालय-मृद आणि जलसंधारण विभाग | १९७८ | १७५ |
| पर्यावरण विभाग | १९८० | ९५ |
| राष्ट्रीय पडीक जमीन विकास मंडळ | १९८५ | १२३ |
| सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ वेस्टलँड्स डेव्हलपमेंट | १९८४ | १३० |
| नॅशनल रिमोट सेन्सिंग एजन्सी | १९८५ | ५३ |
| कृषी मंत्रालय | १९८५ | १७४ |
| कृषी मंत्रालय | १९९४ | १०७ |
| नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सर्व्हे अँड लँड यूज प्लॅनिंग (NBSS & LUP) | १९९४ | १८८ |
| NBSS आणि LUP (सुधारित) | २००४ | १४७ |

स्रोत – Soil Moisture Importance, 2020

मृदेची धूप व ते निर्माण करणारे घटक

मृदेची धूप म्हणजे भौतिक शक्तींद्वारे मृदेची त्याच्या निर्मितीच्या दरापेक्षा जास्त दराने मृदेचा थर काढून टाकणे आहे. सुरुवातीला, धूप मृदाचा पोषक-समृद्ध असलेला वरचा सुपीक थर काढून टाकते, ज्यामुळे मृदेची उत्पादन क्षमता कमी होते. मृदेची धूप दोन श्रेणींमध्ये वर्गीकृत केली जाते, म्हणजे, प्रवेगक आणि भूगर्भीय धूप. भूगर्भीय धूप ही नैसर्गिक घटना आहे, जी खडकांच्या विघटनाच्या निरंतर प्रक्रियेद्वारे उद्भवते ज्यामध्ये धूप दर हा मृदेच्या निर्मिती दरापेक्षा कमी राहतो. याउलट, प्रवेगक धूपमध्ये, मृदाची धूप होण्याचा दर ठराविक पातळी ओलांडतो आणि वेगाने झीज होते. जंगलतोड, खाणकाम आणि सघन आणि सदोष कृषी पद्धती यासारख्या मानववंशीय क्रियाकलाप त्वरीत मृदाच्या धूपसाठी जबाबदार आहेत

पाणी आणि वारा हे दोन प्रमुख घटक आहेत जे विविध प्रकारच्या धूप प्रक्रियेद्वारे मृदाचा ऱ्हास करतात. जागतिक स्तरावर, एकूण निकृष्ट भूभागापैकी सुमारे २८% भाग वाऱ्याच्या धूपाने प्रभावित आहे. वाहणारे पाणी हे मोकळ्या जमिनीतून मृदाचे कण काढून टाकते, तर वारा असुरक्षित जमिनींमधून सैल आणि विलग मृदाचे कण उडवून देतो. जमिनीच्या ऱ्हासाच्या इतर प्रक्रिया म्हणजे मृदाचे संघटन, पाणी साचणे, आम्लीकरण, क्षारीकरण, हवामान परिस्थिती आणि पीक व्यवस्थापन पद्धतींवर अवलंबून असते.

पाण्याची धूप

जगभरात, पाण्याची धूप हा मृदाची धूप होण्याचा सर्वात गंभीर प्रकार आहे. पाण्याची धूप हे आर्द्र आणि उप-दमट कृषी-परिस्थितीतील क्षरणाचे एक प्रचलित प्रकार आहे. हे कोरड्या आणि अर्धशुष्क प्रदेशात देखील समस्या निर्माण करते. पाण्याची धूप मध्ये तीन मूलभूत टप्प्यांचा समावेश होतो, म्हणजे मृदेचे कण सुटे होणे, वहन आणि निक्षेप. मृदाच्या कणांची हालचाल आणि विलग होण्यास कारणीभूत घटकांपैकी पाऊस हा एक प्रमुख घटक आहे. विलग केलेले मृदाचे कण मोकळे आणि पाणी वाहून नेणारी मृदाची छिद्रे सील करतात आणि प्रवाहाला कारणीभूत ठरतात. पहिले दोन टप्पे मृदाची धूप होण्याचे प्रमाण निर्धारित करतात आणि तिसरा टप्पा बाजूने धूप झालेल्या सामग्रीचे वितरण निर्धारित करतो.

धूप नियंत्रण पद्धती व्यवस्थापित करण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी पाण्याच्या धूपाची यंत्रणा आणि व्याप्ती समजून घेणे महत्वाचे आहे. स्प्लॅश, शीट, रील हे पाण्याद्वारे मृदाची धूप करण्याचे मुख्य प्रकार आहेत. पाण्याच्या धूपाचे इतर प्रकार म्हणजे नाल्यांची निर्मिती, उतार, बोगदा, प्रवाह किनारा आणि किनारपट्टीची धूप.

i) Splash Erosion (स्प्लॅश धूप)

'स्प्लॅश धूप' हा पाण्याद्वारे मृदाची धूप होण्याचा पहिला प्रकार आहे. मृदाच्या पृष्ठभागावर पडणारे पावसाचे थेंब मृदाचे एकत्रिकरण मोडतात आणि त्यांच्या स्त्रोतापासून मृदाचे कण विखुरतात आणि पसरतात, ज्याला स्प्लॅश धूप म्हणतात. स्प्लॅश धूपच्या प्रक्रियेमध्ये मृदाच्या कणांवर पावसाच्या थेंबाचा प्रभाव होतो आणि खड्ड्यांची निर्मिती होते.

ii) Sheet Erosion (शीट धूप)

स्प्लॅश धूपचा हा पुढचा टप्पा आहे, ज्यामुळे शीट धूप लगेच सुरू होते. वाहत्या पाण्याने शेताच्या संपूर्ण उताराच्या पृष्ठभागावरुन सुपीक जमिनीचा पृष्ठभाग एकसारखा पातळ थर काढून टाकला जातो. शीट धूप हे कण वेगळे करणे, पावसाची तीव्रता आणि जमिनीचा उतार यांचे कार्य आहे. एकूण मृदेची जी धूप होते त्यापैकी जवळजवळ ७०% धूप फक्त स्प्लॅश आणि शीट धूप यामुळे होते.

iii) Rill Erosion (रील धूप)

पाणी जमिनीवरून वाहताना छोट्या छोट्या प्रवाहाद्वारे देखील वाहत असते, तेव्हा त्याद्वारे मृदाचे कण आणि सेंद्रिय पदार्थांनी भरलेल्या पाण्याच्या प्रवाहाचे हे वहन करते. याद्वारे जी धूप होते त्याला रिल धूप म्हणून ओळखले जाते. मृदाच्या नुकसानासाठी धूप करण्याचा हा प्रगत प्रकार आहे. रिल धूप हा पाण्याच्या धूपचा दुसरा सर्वात सामान्य प्रकार आहे. मृदाची क्षरणक्षमता, जमिनीचा उतार, वाहून जाणारी वहन क्षमता आणि पाण्याच्या प्रवाहाची हायड्रॉलिक शीअर (shear) हे यासाठी प्रमुख घटक आहेत.

**मृदा व जल संधारणाविषयी उपाययोजना**

मृदा आणि जलसंधारणासाठी दोन प्रकारचे उपाय आहेत, ते म्हणजे यांत्रिक उपाय आणि जैविक उपाय. यांत्रिक उपाय म्हणजे कायमस्वरूपी आणि अर्ध-स्थायी संरचना आहे. ज्यामध्ये टेरेसिंग, बंडिंग, ट्रेंचिंग, चेक डॅम, गॅबियन स्ट्रक्चर्स, लूज/स्टोन बोल्डर्स, क्रिब वॉल इत्यादींचा समावेश असतो तर जैविक उपाय म्हणजे वनस्पती उपाय, ज्यात वनीकरण, कृषी वनीकरण, फलोत्पादन आणि कृषी पद्धती यांचा समावेश होतो.

१) **यांत्रिक उपाययोजना**

यांत्रिक उपाय हे जमिनीचा उतार सुधारण्यासाठी, जलमार्गांपर्यंत सुरक्षितपणे वाहून जाणारे पाणी पोहोचवण्यासाठी, अवसादन आणि प्रवाहाचा वेग कमी करण्यासाठी आणि पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. नियंत्रण उपायांची कार्यक्षमता आणि टिकाव सुधारण्यासाठी हे उपाय एकटे वापरले जातात किंवा जैविक उपायांसह एकत्रित केले जातात. अत्यंत क्षरण आणि ढासळलेल्या भूक्षेत्रात जैविक उपायांना यांत्रिक संरचनांनी पूरक केले पाहिजे.

अनेक कायमस्वरूपी आणि तात्पुरते यांत्रिक उपाय उपलब्ध आहेत जसे की टेरेस, कंटूर बंडिंग, चेक डॅम, गॅबियन्स, डायव्हर्शन ड्रेन, जिओ-टेक्सटाइल इ. धूप, मृदाचा प्रकार, स्थलाकृति आणि हवामानाच्या तीव्रतेवर आधारित यांत्रिक उपायांना प्राधान्य दिले जाते.

२) **जैविक उपाययोजना (कृषी आणि कृषी वनीकरण)**

कृषी विषयक उपाय हे जर उतार २% किंवा त्यापेक्षा कमी असेल तर लागू होतात. या उपाययोजनांमुळे पावसाच्या थेंबांचा जमिनीच्या पृष्ठभागावर आच्छादन कमी होतो आणि मृदेचा धूप होण्याचा दर कमी करते आणि पाणी शोषण्याची क्षमता वाढते. हे उपाय स्वस्त, टिकाऊ आणि संरचनात्मक उपायांपेक्षा अधिक प्रभावी असू शकतात, महत्त्वाचे कृषीविषयक उपाय खाली वर्णन केले आहेत.

ISSN : 2278-9308
Octember, 2023

➢ Contour farming (समोच्च शेती)

समोच्च शेती ही डोंगराळ कृषी-परिस्थिती आणि उतार असलेल्या जमिनींमध्ये मृदा आणि जलसंवर्धनासाठी सर्वात सामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या कृषीशास्त्रीय उपायांपैकी एक आहे. नांगरणी, पेरणी, आंतर-पिके इत्यादी सर्व कृषी क्रिया समोच्च रेषेत केल्या जातात.

➢ पिकांची निवड

मृदा आणि जलसंधारणासाठी योग्य पिकाची निवड महत्त्वाची आहे. पावसाची तीव्रता आणि गंभीर कालावधी, बाजारपेठेतील मागणी, हवामान आणि शेतकऱ्याची संसाधने यानुसार पिकाची निवड करावी. चांगले बायोमास, कॅनॉपी कव्हर आणि विस्तृत रूट सिस्टम असलेले पीक पावसाच्या धूप प्रभावापासून मृदाचे संरक्षण करते आणि वाहण्यास अडथळा निर्माण करते आणि त्यामुळे मृदा आणि पोषक तत्वांचे नुकसान कमी करते. ज्वारी, मका, बाजरी, इत्यादि सारखी किंवा उंच वाढणारी पिके आहेत जी मृदा उघड करतात आणि धूप प्रक्रिया प्रवृत्त करतात. तर दाट छत आच्छादन आणि जोमदार मूळ प्रणाली असलेली जवळ वाढणारी किंवा धूप प्रतिरोधक पिके उदा. चवळी, हरभरा, काळा हरभरा, भुईमूग इ. ही मृदाची धूप कमी करण्यासाठी सर्वात योग्य पिके आहेत.

➢ पिकांतील फेरबदल

ही पद्धती म्हणजे जमिनीची सुपीकता न बिघडवता कमीत कमी गुंतवणुकीतून जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एकाच शेतात लागोपाठ विविध प्रकारची पिके घेण्याची प्रथा आहे. उच्च छत आच्छादित पिकांसह योग्य आवर्तन जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत करते; जमिनीची धूप कमी करताना तणांची वाढ रोखते, कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो, इनपुट वापर कार्यक्षमता आणि प्रणालीची उत्पादकता वाढते

➢ आंतरपिके

एकाच शेतात दोन किंवा अधिक पिकांची एकाच वेळी निश्चित किंवा पर्यायी पंक्तीसह लागवड करणे याला आंतरपीक असे म्हणतात. पिके, मृदाचा प्रकार, भूगोल आणि हवामानाच्या परिस्थितीनुसार आंतरपिके वर्गीकृत केले जाऊ शकतात. आंतरपीक जमिनीच्या पृष्ठभागावर चांगले संरक्षण प्रदान करते, पावसाच्या थेंबांचा थेट प्रभाव जमिनीवर होत नाही आणि मृदाची धूप होण्यापासून संरक्षण करते

➢ संवर्धन मशागत

या पद्धतीमध्ये मृदेची धूप आणि प्रवाह कमी करण्यासाठी पुढील पीक लागवडीपूर्वी आणि नंतर जमिनीच्या पृष्ठभागाचा किमान ३०% भाग पीक अवशेषांनी झाकलेला असावा. या संज्ञेमध्ये कमी मशागत, किमान मशागत, ना-मशागत, थेट कवायती, पालापाचोळा मशागत, गवत-आच्छादन शेती, कचरा शेती, पट्टी मशागत इत्यादींचा समावेश होतो. यामुळे बाष्पीभवनामुळे होणारी धूप कमी होते.

➢ सेंद्रिय शेती

सेंद्रिय शेती ही एक कृषी उत्पादन प्रणाली आहे जी कृत्रिम खते किंवा कीटकनाशकांचा वापर टाळते आणि निरोगी आणि वैविध्यपूर्ण पर्यावरण राखण्यासाठी वनस्पती पोषक पुरवठा करते. उदा शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत, हिरवळीचे खत, अवशेष आच्छादन, पीक रोटेशन इत्यादींचा समावेश करते. ही एक पर्यावरणपूरक कृषी पीक उत्पादन प्रणाली आहे.

उच्च सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण आणि सतत मृदाचा पृष्ठभाग आच्छादित पिके, हिरवळीचे खत आणि अवशेष पालापाचोळा राखणे, यामुळे सेंद्रिय शेतीमध्ये मृदेची धूप कमी होते. यामुळे मोठ्या प्रमाणात सेंद्रिय खतांचा समावेश होतो ज्यामुळे मृदाच्या सुधारित जैव-भौतिक-रासायनिक गुणधर्मांद्वारे पाण्याचा निचरा वाढतो आणि शेवटी मृदेची धूप कमी होते. सेंद्रिय शेतीमुळे मृदेची धूप होण्याचे प्रमाण पारंपारिक शेतीच्या तुलनेत ३० ते ४० % कमी असू शकते.

➢ शेती कृषी वनीकरण उपाय

कृषी वनीकरण ही एक शाश्वत जमीन व्यवस्थापन प्रणाली आहे ज्यामध्ये एकाच वेळी जमिनीच्या एकाच तुकड्यावर कृषी पिके आणि पशुधन उत्पादनांसह झाडे किंवा झुडुपे यांची लागवड समाविष्ट आहे. हे प्रभावी मृदा आणि जलसंवर्धनासाठी एक उदयोन्मुख तंत्रज्ञान आहे आणि त्यात मृदाची धूप नियंत्रित करण्यासाठी, शाश्वत कृषी उत्पादन

ISSN : 2278-9308
Octember, 2023

प्रणाली विकसित करण्यासाठी, पर्यावरणीय प्रदूषण कमी करण्यासाठी आणि शेतीची अर्थव्यवस्था वाढवण्यासाठी विस्तृत पद्धतींचा समावेश आहे.

**निष्कर्ष**

विविध प्रकारच्या ऱ्हासाच्या वाढत्या दरामुळे जमीन मर्यादित आणि हळूहळू कमी होत आहे आणि त्यामुळे लागवडीयोग्य जमीन क्षेत्र खर्च करण्याशिवाय पर्याय नाही. एकतर उपलब्ध साधनसंपत्तीनुसार कृषी उत्पादकता वाढवणे किंवा खराब झालेल्या जमिनी पुनर्संचयित करणे हा एकमेव मार्ग आहे. सर्व प्रकारच्या स्थलीय परिसंस्थेतील उत्पादकतेसाठी निरोगी मृदा आणि पाण्याची उपलब्धता महत्त्वाची आहे कारण वनस्पतींना त्यांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी सुधारित जैव-भौतिक-रासायनिक गुणधर्म असलेली सुपीक मृदा आणि पाण्याचा दर्जा आवश्यक असतो. जैविक उपाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आणि पर्यावरणास अनुकूल आहेत; मृदा आणि जलस्रोतांच्या संवर्धनासह मृदाचे गुणधर्म देखील सुधारतात. पुढे, जैविक आणि यांत्रिक उपायांचा एकत्रित वापर कृषी उत्पादकता सुधारण्यास आणि टिकवून ठेवण्यास मदत करेल.

**मृदा आणि पाणी संवर्धनासाठी भविष्यातील दृष्टीकोन**

वाढती जागतिक लोकसंख्या, अन्न असुरक्षितता आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास हे सध्याच्या हवामान बदलाच्या युगातील प्रमुख समस्या आहेत. वर्ष २०५० मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे १० अब्ज होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढे, जलद औद्योगिक वाढ आणि सघन शेती पद्धतीमुळे नजीकच्या भविष्यात जमीन आणि जलस्रोतांवर दबाव वाढेल अशी अपेक्षा आहे. म्हणून, मृदा आणि जलसंधारणामध्ये एक आदर्श बदल आणि त्याचे व्यवस्थापन कृषी शाश्वततेसाठी आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

१ Dimelu MU, Ogbonna SE, Enwelu IA, (2013), "Soil Conservation Practices Among Arable Crop Farmers In Enugu–North Agricultural Zone, Nigeria: Implications For Climate Change", Journal of Agricultural Extension. 2013;17(1) Pp 184-196

२ Kumawat Anita (2020), "Soil and Water Conservation Measures for Agricultural Sustainability", Open Access Peer-Reviewed Chapter, From The Edited Volume, 'Soil Moisture Importance' Edited by Ram Swaroop Meena and Rahul Datta.

३ Jhariya MK, Surendra S, Bargali A, Raj S. (2015), "Possibilities And Perspectives Of Agroforestry In Chhattisgarh", In: Zlatic M, editor. Precious Forests-Precious Earth. Croatia: IntechOpen; 2015, Pp. 237-257

४ Mader P, Flieβbach A, Dubois D. (2002), "Soil Fertility and Biodiversity in Organic Farming", Science, 2002, Pp 1694-1697

५ Manivannan S, Thilagam VK, Khola OP. (2017), "Soil and Water Conservation in India: Strategies and Research Challenges", Journal of Soil and Water Conservation. 2017;16(4), Pp 312-319

६ Sahoo DC, Madhu M, Adhikary PP, Dash CJ, Sahu SS, Devi S.(2017), "Adoption Behaviour Of Different Soil And Water Conservation Measures Among Tribal Farmers Of Gajapati, Odisha", Indian Journal of Soil Conservation. 2017;45(1):112-116

७ Sharma R, Xu J, Sharma G. (2007), "Traditional Agroforestry In The Eastern Himalayan Region: Land Management System Supporting Ecosystem Services", Tropical Ecology. 2007; 48(2), Pp 189-200.

ISBN No. : 978-93-95494-36-6

## ONE DAY NATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE
## ON

# ENVIRONMENT : ISSUES & CHALLANGES

## Date : Wednesday, 28nd June - 2023

## CONFERENCE PROCEEDINGS

*- EDITORS -*

***Prof. Dr. Dhananjay K. Sontakke***
***Dr. Sandip B. Kale***

*Organized by*

**AADHAR SOCIAL RESEARCH & TRAINING, DEVELOPMENT INSTITUTE, AMRAVATI**

IN COLLABORATION WITH

Shri Bapuraoji Deshmukh Foundation's

**PRIYADARSHINI MAHILA MAHAVIDYALA, WARDHA**

&

Yeshwant Rural Education Society's

**YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO DIST. WARDHA**

ISBN- 978-93-95494-36-6

# INDEX


| No. | Title of the Paper Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Greening the Future: A Call to Action for Environmental Conservation **Dr. Milind V. Shirbhate** | 1 |
| 2 | Environment Education And Society **Dr. Ravindra B. Tembhurne** | 4 |
| 3 | The National Green Tribunal: A New Beginning For Environment Protection **Dr. Manisha Sureshchandra Araj** | 6 |
| 4 | Environmental Ethics and Climate Justice **Dr. Poorva Bhonde** | 10 |
| 5 | Role of Government and Individuals in Climate Control – An Overview **Dr.Vijaya Lakshmi V.** | 13 |
| 6 | Water and Environment **Smt. Manjusha Kamalakar Swami** | 17 |
| 7 | Environment Awareness And Sociality **Dr. Chandrashekhar N.Mohod** | 20 |
| 8 | Environmental Pollution in India: Assessing Challenges and Solutions for a Sustainable Future **Arjun Namdevrao Khobragade** | 24 |
| 9 | Environmental Degradation: Causes, Remedies **Dr. Koneru Babanna Dummalwad** | 32 |
| 10 | Surveyon Ethnobotanical Flora Of Wardharegion **Swati D. Yeotkar, Vijay G. Manwatkar, Rahul S. Pawar** | 36 |
| 11 | अमरावती जिल्ह्यातील शहानूर नदी खोऱ्यातील भूपृष्ठरचना आणि वनक्षेत्राचे भौगोलिक अध्ययन विरेंद्र खंडारे, डॉ. सावन एम. देशमुख | 41 |
| 12 | अमरावती जिल्ह्यातील पर्जन्य आणि एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता यातील परस्परसबंध : भौगोलिक अध्ययन डॉ. दीपक उदयराज अंबोरे | 46 |
| 13 | पर्यावरणीय कायदे- स्वरूप आणि प्रासंगिकता डॉ. ममता प्र. फुके | 52 |
| 14 | पर्यावरण आणि माहिती तंत्रज्ञानाची भुमिका डॉ. रमेश काशीराम शेंडे | 57 |
| 15 | मनरेगाचे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन कु. श्रेया रविंद्र देशमुख | 61 |
| 16 | पर्यावरण संरक्षणासाठी घनकचरा व्यवस्थापनाची आवश्यकता कु. विद्या बाळासाहेब तळखंडकर | 66 |
| 17 | डॉ. जयंत नारळीकर यांच्या पर्यावरणवादी मराठी विज्ञानकथा प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 72 |
| 18 | पर्यावरण आणि आग डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर) | 77 |
| 19 | पर्यावरण आणि ध्वनी प्रदूषण डॉ. अनंत रिंढे | 82 |
| 20 | पर्यावरण प्रदूषण व मानवी आरोग्य प्रा. अभिजीत प्रभाकर दोड | 86 |
| 21 | शाश्वत विकास आणि पर्यावरण अंजली कमलाकर स्वामी | 89 |

# अमरावती जिल्ह्यातील पर्जन्य आणि एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता यातील परस्परसबंध : भौगोलिक अध्ययन

डॉ. दीपक उदयराज अंबोरे
विभाग प्रमुख (भूगोल विभाग) महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती
मोबाईल क्र – ९७३०१९८६७८, इमेल – deepakambore710@gmail.com

सारांश

कृषी हा भारताचा प्रमुख व्यवसाय आहे आणि यावर मूळ अर्थव्यवस्था अवलंबून आहे. परंतु कृषीचे उत्पन्न हे त्या प्रदेशात पिकांना मिळणाऱ्या पाण्याच्या प्रमाणावर अवलंबून असते. पाण्याचा मुख्य स्त्रोत पर्जन्य असल्याने भारतातील बहुतांश कृषी ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. म्हणून कृषी उत्पादन हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पर्यावरणाच्या अभ्यासात याचे महत्व आहे.

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्य आणि एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता याच्यातील परस्परसंबंधाचे अध्ययन केलेले आहे.

*बीजसंज्ञा*

पर्जन्य, सरासरी, अन्नधान्य, कृषी, उत्पादकता, परस्परसंबंध

## प्रस्तावना

कृषीद्वारे विविध पिकांचे उत्पादन होत असते, परंतु प्रामुख्याने बहुतांश भागात अन्नधान्य पिकांची शेती अधिक प्रमाणात केली जाते. अन्नधान्य पिकांद्वारे लोकसंख्येचे भरण-पोषण होत असते त्यामुळे अन्नधान्य पिके अधिक प्रमाणात घेतली जातात. तृणधान्ये व कडधान्ये पिकांचा अन्नधान्य पिकांमध्ये समावेश होतो. पर्जन्याचे प्रमाण अधिक असेल तर अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत मिळते कारण अशा क्षेत्रात भूजलाची पातळी वाढलेली असते, त्यामुळे जमिनीस ओलावा टिकून राहतो.

अमरावती जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील जिल्हा असून सुमारे ७०% जमीन ही लागवडीखाली आहे. जिल्ह्यातील कृषी ही प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून या जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अनिश्चित आहे. प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्ह्यातील तालुकानिहाय सरासरी पर्जन्याचे वितरण आणि अन्नधान्य पिकांची उत्पादकता यांचे व त्यांचातील परस्परसंबंधाचे अध्ययन करण्यात आलेले आहे.

## उद्दिष्ट्ये

प्रस्तुत अभ्यासाची मुख्य उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे,

१) अमरावती जिल्ह्यातील वार्षिक सरासरी पर्जन्याचे तालुकानिहाय वितरण अभ्यासणे.

२) अमरावती जिल्ह्यातील एकूण अन्नधान्य पिकांचे तालुकानिहाय वितरण अभ्यासणे.

३) अमरावती जिल्ह्यातील पर्जन्याचे वितरण आणि अन्नधान्य पिकांची उत्पादकता यातील परस्पर संबंधाचे अध्ययन करणे.

## माहीती स्त्रोत व अभ्यास पद्धती

प्रस्तुत संशोधन हे द्वितीय स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारावर आहे. संबंधित माहिती ही ऋतू व पीक अहवाल, अमरावती जिल्हा आणि कृषी कार्यालय अमरावती मधून संकलित केलेली आहे. प्राप्त आकडेवारी ही सारणी मध्ये मांडून जिल्ह्याच्या नकाशात वितरण दर्शविलेले आहे. दोन घटकातील परस्परसंबध हा सहसंबध काढून समाश्रेयण रेषेद्वारे दाखविले आहे.

एकूण अन्नधान्य पिकांच्या उत्पादक्तेसाठी पुढील सूत्राचा उपयोग केलेला आहे.

$$\text{उत्पादकता (किलोग्रॅम/हेक्टर)} = \frac{\text{उत्पादन (मेट्रिक टन)}}{\text{पीक क्षेत्र}} \times १०००$$

प्रस्तुत संशोधन हे वर्ष २०१५ आणि २०२० या पाच वर्षातील आकडेवारीवर आधारीत आहे.

## अभ्यास क्षेत्र

अमरावती जिल्हा महाराष्ट्र राज्यात पूर्वेकडे असून जिल्ह्याचा विस्तार हा २०° ३३' उत्तर ते २१° ४७' उत्तर अक्षांश आणि ७६° ४३' पूर्व ते ७८° २४' पूर्व रेखांश दरम्यान आहे.

जिल्ह्याने एकूण १२२१० चौ.कि.मी. क्षेत्रफळ व्यापलेले असून २०११ च्या जनगणनेनुसार क्षेत्रफळ आणि एकूण लोकसंख्या २६०७१६० आहे, त्यापैकी १३४५६१४ पुरुष आणि १२६१५४६ महिला आहेत.

जिल्ह्यात एकूण १४ तालुके समाविष्ट असून अमरावती, अचलपूर, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, भातकुली, तिवसा, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे आणि धामणगाव रेल्वे यांचा समावेश आहे.

### वार्षिक सरासरी पर्जन्याचे वितरण

सारणी क्रमांक १ मध्ये जिल्ह्यातील वर्ष २०१५ आणि २०२० या काळात झालेल्या वार्षिक सरासरी पर्जन्याचे वितरण तालुकानिहाय दर्शविलेले आहे.

अमरावती जिल्ह्यात वर्ष २०१५ मध्ये सुमारे ८१४.४९ मिमी एवढा पाऊस पडला होता तर २०२० मध्ये यात ४७.५१ मिमी ची वाढ होऊन या काळात ८६२ मिमी पर्जन्याची नोंद आढळते. मात्र तालुकानिहाय यामध्ये चढ-उतार झालेले आहेत.

वर्ष २०१५ आणि २०२० या दोन्ही काळात चिखलदरा आणि धारणी तालुक्यात सर्वाधिक १००० मिमी पेक्षा अधिक पर्जन्याची नोंद आढळते. ह्या दोन तालुक्याचे क्षेत्र मेळघाट प्रदेशात येते व या क्षेत्रात वनक्षेत्र अधिक आहे, त्यामुळे पर्जन्याचे प्रमाण अधिक आहे. परंतु २०२० मध्ये वर्ष २०१५ च्या तुलनेत या दोन्ही तालुक्यात वार्षिक पर्जन्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

वर्ष २०१५ मध्ये भातकुली, अमरावती, मोर्शी, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, तिवसा आणि धामणगाव रेल्वे या तालुक्यात ७०० ते ८०० मिमी वार्षिक सरासरी पर्जन्याची नोंद होती. तर अचलपूर, चांदूर बाजार, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी या तालुक्यात ६०० ते ७०० मिमी पर्जन्याची नोंद झाली.

सारणी क्रमांक १

अमरावती जिल्हा – वार्षिक सरासरी पर्जन्य (२०१५ आणि २०२०)


| वार्षिक सरासरी पर्जन्य मि.मी. मध्ये | | |
|---|---|---|
| तालुके | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१९-२० |
| धारणी | ११७२.७ | १०६७.६० |
| चिखलदरा | १५२६.७७ | १३९५.५० |
| अंजनगाव सुर्जी | ६१६.३० | ५९४ |
| अचलपूर | ६९७.५० | ८०६.२० |
| चांदूर बाजार | ६८८.३० | ६५८.१० |
| मोर्शी | ७५८.४० | ७१२ |
| वरुड | ८६२.४० | ७८२ |
| तिवसा | ७२७.८० | ६०७.४० |
| अमरावती | ७६५.८० | ५९४ |
| भातकुली | ७६८.१४ | ६९९.३० |
| दर्यापूर | ६३७.४० | ६०७.४० |
| नांदगाव खंडेश्वर | ७३८.१४ | ७५३.२० |
| चांदूर रेल्वे | ७४५.५० | ७१०.४० |
| धामणगाव रेल्वे | ७२७.८० | ८५९.७० |
| एकूण | ८१४.४९ | ८६२ |

स्त्रोत – कृषी सांख्यिकीय कार्यालय, अमरावती

वर्ष २०२० मध्ये धामणगाव रेल्वे आणि अचलपूर या दोन तालुक्यात २०१५ च्या तुलनेत सरासरी पर्जन्यात वाढ झालेली दिसते. वर्ष २०२० मध्ये धामणगाव मध्ये ८५९.७० मिमी आणि अचलपूर मध्ये ८०६.२ मिमी पर्जन्य झालेले आढळते. वरुड, मोर्शी आणि चांदूर रेल्वे या तालुक्यात ७०० ते ८०० सरासरी पर्जन्याची नोंद आढळून येते. वरुड, मोर्शी आणि चांदूर रेल्वे या तालुक्यात २०२० मध्ये पर्जन्यात घट झालेली आढळते तर नांदगाव खंडेश्वर मध्ये वाढ झालेली दिसून येते. अमरावती आणि अंजनगाव सुर्जी तालुक्यात या काळात जिल्ह्यात सर्वात कमी ५९४ मिमी सरासरी पर्जन्य झाले असून २०१५ पेक्षा त्यात घट झालेली आहे. इतर तालुक्यातील म्हणजेच भातकुली, चांदूर बाजार, तिवसा आणि दर्यापूर तालुक्यात ६०० ते ७०० मिमी सरासरी पर्जन्य झाले असून २०१५ पेक्षा मात्र ते कमी झालेले आहे.

अमरावती जिल्हा

तालुकानिहाय वार्षिक सरासरी पर्जन्य (२०१५ व २०२०)




सूची
सरासरी पर्जन्य मि.मी. मध्ये
< ७५० ▭ ७५० - १००० ▭ > १०००

एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता

अमरावती जिल्ह्यात कापूस आणि सोयाबीन हे प्रमुख पिके आहेत. तर त्यानंतर अन्नधान्य पिकांचे उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यात गहू, ज्वारी, हरभरा, तूर, मुग व उडीद ह्या पिकांचे प्रामुख्याने उत्पादन घेतले जाते. त्यापैकी ज्वारी आणि हरभरा याचे उत्पादन व लागवड प्रमाण अधिक आहे. सारणी क्रमांक २ मध्ये अमरावती जिल्ह्यातील वर्ष २०१५ आणि २०२० मधील एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता तालुकानिहाय दर्शविलेली आहे.

सारणी क्रमांक २

अमरावती जिल्हा – एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता (२०१५ आणि २०२०)

| उत्पादकता प्रती हेक्टर किलोग्रॅम मध्ये | | |
|---|---|---|
| तालुके | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१९-२० |
| धारणी | ३२१५ | ३१७१ |
| चिखलदरा | ६७५ | ६२० |
| अंजनगाव सुर्जी | ६५४ | ६३९ |
| अचलपूर | ४४६ | ५५९ |
| चांदूर बाजार | १२३६ | १२१९ |
| मोर्शी | २५६३ | ३९४२ |
| वरुड | ७४३ | ६३८ |
| तिवसा | ९५३ | १४९३ |


| | | |
|---|---|---|
| अमरावती | ४४२ | ४३७ |
| भातकुली | ३०७ | ५०८ |
| दर्यापूर | ३१४ | ४९० |
| नांदगाव खंडेश्वर | १२५१ | १४०३ |
| चांदूर रेल्वे | ६४६ | ९११ |
| धामणगाव रेल्वे | १४१४ | १८९२ |
| एकूण | ७७७ | ९५५ |

माहिती स्रोत – ऋतू व पीक अहवाल (२०१४-१५ व २०१९-२०)

अमरावती जिल्ह्यात वर्ष २०१५ मध्ये एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता ही ७७७ किलोग्रॅम प्रती हेक्टर होती. तर २०२० मध्ये ही उत्पादकता सुमारे १७८ किलोग्रॅम प्रती हेक्टर एवढी वाढलेली आहे. वर्ष २०२० मध्ये अन्नधान्य पिकांची एकूण उत्पादकता ही ९५५ किलोग्रॅम प्रती हेक्टर आहे.

वर्ष २०१५ आणि २०२० या दोन्ही काळात धारणी तालुक्यात अन्नधान्य पिकांची उत्पादकता सर्वाधिक आढळते, कारण धारणी तालुक्यात अन्नधान्य पिकांचे क्षेत्र अधिक आहे. धारणी मध्ये दोन्ही काळात उत्पादकता ही ३००० किलोग्रॅम प्रती हेक्टर पेक्षा अधिक आहे. तर मोर्शी, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, आणि चांदूर बाजार तालुक्यात दोन्ही काळात अन्नधान्य पिकांची उत्पादकता ही १००० किलोग्रॅम प्रती हेक्टर पेक्षा अधिक होती. तर तिवसा मध्ये २०१५ मध्ये उत्पादकता ९५३ किलोग्रॅम/हेक्टर असून २०२० मध्ये ती वाढून १४९३ किलोग्रॅम/हेक्टर झालेली निदर्शनास येते.

वरुड मध्ये २०१५ मध्ये ७४३ किलोग्रॅम/हेक्टर तर २०२० मध्ये ६३८ किलोग्रॅम/हेक्टर अन्नधान्य पिकांची उत्पादकता आढळते. वरुड तालुक्यातील उत्पादकता ही कमी झालेली आहे. चिखलदरा, अंजनगाव सुर्जी तालुक्यात २०१५ व २०२० दोन्ही वर्षात ६०० ते ७०० किलोग्रॅम/हेक्टर एवढी उत्पादकता असून २०२० मध्ये मात्र या दोन तालुक्यात कमी झालेली आहे.




चांदूर रेल्वे तालुक्यात २०१५ मध्ये ६४६ आणि २०२० मध्ये ९११ किलोग्रॅम/हेक्टर उत्पादकता असून यामध्ये वाढ झालेली आहे. तर २०१५ मध्ये अचलपूर, अमरावती यालुक्यात ४४० ते ४५०

 ISBN- 978-93-95494-36-6

किलोग्रॅम/हेक्टरउत्पादकता असून अचलपूर २०२० मध्ये वाढ होऊन ही उत्पादकता ५५१ किलोग्रॅम/हेक्टर तर अमरावती मध्ये यात थोडी घट होऊन ४३७ किलोग्रॅम/हेक्टर एवढी झालेली आहे.

दर्यापूर (३१४) आणि भातकुली (३०७) तालुक्यात २०१५ मध्ये ३०० ते ३२० किलोग्रॅम/हेक्टर असलेली उत्पादकता २०२० मध्ये वाढलेली आहे. वर्ष २०२० मध्ये अन्नधान्य पिकांची उत्पादकता दर्यापूर तालुक्यात ६१० किलोग्रॅम/हेक्टर तर भातकुली तालुक्यात ५०८ किलोग्रॅम/हेक्टर झालेली आहे.


अमरावती जिल्ह्यात सरासरी अन्नधान्य पिकांची उत्पादकता ही वाढलेली असली तरी तालुकानिहाय यात तफावत आहे. काही तालुक्यात यामध्ये घट तर काही तालुक्यात वाढ झालेली आहे. यामध्ये पर्जन्याचा प्रभाव आहे.

**पर्जन्याचे वितरण आणि अन्नधान्य पिकांची उत्पादकता यातील परस्पर संबंध**

जिल्ह्यातील तालुकानिहाय पर्जन्याचे वितरण आणि एकूण अन्नधान्य पिकांची उत्पादकता यांच्यातील सहसंबंध २०१५ व २०२० या दोन्ही काळात धनात्मक आहे.

***अमरावती जिल्हा***

***वार्षिक सरासरी पर्जन्य व अन्नधान्य पिकांची उत्पादकता यातील सहसंबंध (२०१५ व २०२०)***




आलेख क्र. १     आलेख क्र. २

या दोन घटकातील परस्परसंबंध २०१५ मध्ये निम्न स्तरीय धनात्मक होता, याकाळातील सहसंबंध मूल्य हे r = +०.२६ होते. तर 't' मूल्य हे १.१०६० होते व यातील सार्थकता ही ९०% होती.

वर्ष २०२० मध्ये ह्या दोन घटकातील सहसंबंध मूल्य हे r = +०.१५ असून t' मूल्य हे १.७८०१ आहे. यातील सार्थकता ही ९५% आढळते.

म्हणजेच अमरावती जिल्ह्यातील पर्जन्य वितरण आणि अन्नधान्य पिकांचे उत्पादन यांच्यात प्रत्यक्ष संबंध आहे. तसेच पर्जन्याचा सकारात्मक प्रभाव हा उत्पादकतेवर पडलेला आहे.

**निष्कर्ष व उपाययोजना**

अमरावती जिल्ह्यात २०१५ पेक्षा २०२० मध्ये एकूण सरासरी पर्जन्यात वाढ झालेली आहे आणि त्यामुळेच जिल्ह्यातील अन्नधान्य पिकांची एकूण उत्पादकता ही वाढलेली आहे. परंतु जिल्ह्याच्या सर्व भागात यात समानता नसून तफावत आहे.

चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यात सर्वाधिक पर्जन्य पडतो परंतु मागील ५ वर्षात यात घट झालेली आहे व त्याचा थेट प्रभाव हा ह्या तालुक्यातील अन्नधान्य पिकांच्या उत्पादकतेवर झालेला आहे. मेळघाटच्या या प्रदेशात नैसर्गिक वनस्पतींचे आच्छादन मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे पर्जन्य चांगला पडतो, परंतु मागील काही काळात या क्षेत्रातील होत असलेल्या अवैध जंगलतोडीमुळे पर्जन्याचे प्रमाण घटलेले आहे.

अमरावती जिल्ह्यातील सरासरी पर्जन्य आणि अन्नधान्य पिकांची उत्पादकता वाढलेली असली तरी ही वाढ पुरेशी नाही. पर्यावरणाच्या समतोलासाठी, कृषी उत्पादनात वाढ होण्यासाठी पर्जन्याचे मुबलक प्रमाण असणे आवश्यक आहे. यामुळे मानवाची प्रगती होण्यास मदत मिळते.

जिल्ह्यात इतर भागात नैसर्गिक वनस्पतीचे आच्छादन कमी असल्याने पर्जन्याचे वितरण देखील कमी आहे. जिल्ह्यातील ज्या तालुक्यात वार्षिक पर्जन्यात घट झालेली आहे त्यातील बहुतांश तालुक्यात अन्नधान्य पिकांची उत्पादकता सुद्धा कमी झालेली आहे.

पर्यावरणाचा समतोल राखूनच शाश्वत विकास करणे शक्य आहे आणि कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी मुबलक पर्जन्य आवश्यक आहे. जंगलांची अवैध तोड पूर्णपणे थांबवून त्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक भागात नैसर्गिक वनस्पतीचे आच्छादन वाढविणे आज काळाची गरज आहे. अन्नधान्य पिकांचे उत्पादन वाढले तर अधिक लोकसंख्येचे भरण पोषण होण्यास मदत मिळेल. तसेच शेतीची सुद्धा प्रगती होईल, पण यासाठी पर्जन्याचे प्रमाण मुबलक असणे आवश्यक आहे. याकरिता पर्यावरणाचे संरक्षण करणे अनिवार्य आहे.

संदर्भ सूची

१) G Arvind, P Ashok Kumar, S GirishKarthi and C R Suribabu (2017), "Statistical Analysis of 30 Years Rainfall Data: A Case Study", IOP Conference Series Earth and Environmental Science 80(1):012067, pp 1-9

२) Guhathakurta, P., Rajeevan, M., (2007), "Trends in the Rainfall Pattern Over India", International Journal of Climatology 28 (11), 1453–1469. doi:10.1002/joc.1640.

३) Hailu Regassa Bedane et.al. (2022), The Impact Of Rainfall Variability And Crop Production On Vertisols In The Central Highlands Of Ethiopia", Environmental Systems Research (2022) 11:26, Pp 1-19

४) सामाजिक-आर्थिक समालोचन, अमरावती जिल्हा, (२०२०-२१), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य.

Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central India. Atmos. Climate Sci. 4 394-403.

ISSN 2394-5303

International | Peer reviewed | Research Journal

# Printing Area

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-106, Vol-02, October 2023



Editor
Dr.Bapu G.Gholap

13) राजन गवस लिखित 'कळप' या कादंबरीतील जीवन जाणिवा
**प्रा. लक्ष्मण व्यं. बिराजदार, उमरगा** ||72

14) रावजी राठोड यांची 'गोठण': पुर्नचर्चा
**डॉ. संजय बालाघाटे** ||75

15) समावेशित शिक्षण व दिव्यांग विद्यार्थी
**प्रा. डा. गोकुल शामराव डामरे, शेगांव** ||81

16) अमरावती शहरातील रस्ते मार्गाची बिटा व गॅमा निर्देशांकाद्वारे....
**प्रा. डॉ. दीपक उदयराज अंबोरे, अमरावती** ||83

17) लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्याचा अनुबंध
**डॉ. अतुल सुरेश पाटील, जळगाव** ||88

18) भारतीय अमृत महोत्सवी कृषी क्षेत्राची उपलब्धी
**प्रा. डॉ. आर. पी. पाटील, प्रा. डॉ. जनार्दन जानजी देवरे, भडगाव** ||92

19) वाढता दहशतवाद आणि भारताची भूमिका
**प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण, शिंदे व्ही. एम., गेवराई, जि. बीड** ||96

20) विवेकी विचारांचा महामेरू : संत तुकाराम
**प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी, अहमदपूर** ||98

21) अफगानों का राजत्व सिद्धान्त–लोदी सुल्तानों के सन्दर्भ में
**भानु प्रताप सिंह, अयोध्या** ||101

22) कथा साहित्य का उद्‌भव एवं विकास
**श्रीमती दीपा सिंह, डॉ. प्रवेश कुमार सिंह, चण्डेश्वर, आजमगढ़** ||105

23) नरक स्वरूप वर्णन
**डॉ. नवीन गहलावत, हरियाणा** ||109

24) नई कविता के विविध आयामों का अनुशीलन नई कविता का प्रारंभ काल
**संतोष कुमार जांगडे, सारंगढ़, जिला– सारंगढ़– बिलाईगढ़ (छ.ग.)** ||112

25) आधुनिक प्रौद्योगिकी: आधुनिक युग में पारंपरिक व्यवसायों और रोजगार....
**डॉ. ऋतु सारस्वत, कौशल्या अरोड़ा, अजमेर (राजस्थान)** ||117

26) वैयाकरणनये बौद्धार्था:
**डॉ. रीतेश–कुमार–पाण्डेय, वृन्दावनम् (मथुरा) उ.प्र.** ||124

वातावरणात नियमित विद्यार्थ्यांसोबत शिक्षणाची समान संधी देवून मुख्य प्रवाहात आणणे व प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे.

४.सामूहिक कृतीमुळे विद्यार्थ्यास सहकार्यात्मक अध्ययन प्रभावी वाटते. गटबांधणी, नेतृत्व विकास सहभाग, आंतरक्रिया इत्यादी सामाजिक कौशल्ये सहकार्यात्मक अध्ययनामुळे विकसीत होऊन समावेशक शिक्षणाचे बलस्थान ठरते. परस्पर सहकार्याने शैक्षणिक विकासात मदत करणे, सर्वांची प्रगती होणे हेच गटाचे यश या कार्यनीतीच्या वैशिष्ट्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून त्यांच्या अंगवळणी ती कशी पडतील, हे शिक्षकाने पाहावे.

५. वर्गशिक्षकाने सर्वप्रकारच्या मुलांना विषय ज्ञान देताना त्यांच्यामध्ये अध्यापन कुशलतेची आवश्यकता असते. तो अध्यापन करीत असताना दुसऱ्या शिक्षकांकडून जरूर तेव्हा त्यास आधार देऊन अध्यापनातील उणीव भरून काढली जाते. अशा वेळी उभय शिक्षकांमधील संबंध लवचिक आणि संपर्क प्रभावी असणे आवश्यक आहे.

६. आपल्या वर्गातील वा खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना एखाद्या विद्यार्थ्याने शिकविल्यास त्या विद्यार्थ्यामध्ये स्वप्रतिष्ठा, आत्मविश्वास बळावेल आणि त्या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये विषय समज वाढेल.

७. उच्चार, भाषा, शरीर, व्यवसाय यांसंबंधित त्रुटी विशेष मुले व सामान्य मुले यांच्यातून दूर होण्यासाठी संबंधित उपचारतज्ज्ञ गरजनिहाय उपचार करतात.

दोन्ही तऱ्हेच्या मुलांच्या शैक्षणिक, भावनिक, सामाजिक इत्यादी गरजा लक्षात घेऊन अभ्याक्रमात वेळो वेळी सुधारणा केल्या जातात.

**संदर्भ सूची.**

१. अवचार, एस., विशेष शिक्षण, पुणे, २०१२.

२. गुळवणी, एम., मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे, २०११.

३. जगताप, एच. एन., शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, २००६

४. दुनाखे, ए., शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे, २००६.

५. भंगाळे, शै., समावेशक शिक्षण, जळगांव,२०१६.

६. सोहोनी—शिरोडे, समावेशक शिक्षण, पुणे, २०१६.

**16**

# अमरावती शहरातील रस्ते मार्गाची बिटा व गॅमा निर्देशांकाद्वारे संपर्कता — भौगोलिक अध्ययन

**प्रा. डॉ. दीपक उदयराज अंबोरे**
सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती

**सारांश :**

रस्ते मार्गाची उत्तम संपर्कता असणे हे त्या भागातील विकासाचे सूचक असते. कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण विकास आणि समृद्धीमध्ये रस्त्यांना विशेष महत्त्व असते. कोणत्याही क्षेत्रातील कृषी, वाणिज्य, व्यापार, प्रशासन, आरोग्य, शिक्षण आणि इतर सर्व सामाजिक—आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्रियाकलापांच्या यशस्वीतेसाठी आणि विकासासाठी रस्ते जोडणी आवश्यक आहे.

अमरावती शहर हे विदर्भातील प्रमुख शहरांपैकी एक असून या शहराच्या विकासात रस्त्याचे मोठे योगदान आहे. प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अमरावती शहरात कालांतराने रस्त्यांची प्रगती झाली असली तरी ही प्रगती सर्वच प्रभागामध्ये सारखी नाही.

प्रस्तुत संशोधन निबंधांमध्ये अमरावती शहरातील मुख्य रस्ते मार्गाच्या संपर्कतेचे अध्ययन बिटा व गॅमा निर्देशांक यांच्या सहाय्याने करण्यात आलेले आहे.

**बीजसंज्ञा** : रस्ते मार्ग, बिटा निर्देशांक, गॅमा निर्देशांक, संपर्कता

**प्रस्तावना :**

वाहतूक प्रणालीतील रस्ते मार्गाद्वारे होणारी वाहतूक हे असे साधन आहे हे भारतातील खेड्यांना शहरांसोबत तसेच सेवा केंद्राशी जोडण्याचे कार्य करते. रस्ते मार्गाच्या संपर्कतेमुळे एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशाकडून स्वत:च्या गरजांची पूर्तता करत असते.

बिटा निर्देशांक हा केंद्रानुसार सरासरी शाखांची संख्या दर्शविण्याचे कार्य करत असते. बिटा निर्देशांकाचे मूल्य ज्या प्रदेशात अधिक असते अशा ठिकाणी रस्ते वाहतूक जाळ्याची संरचना गुंतागुंतीची असल्याचे आढळते (Deshpande S, २००७).

रस्ते वाहतूक जाळ्याची संपर्कता काढण्यासाठी के. जे. कांस्की (१९६३) यांनी आणखी एक महत्वाचा सुचविलेला निर्देशांक म्हणजे गॅमा निर्देशांक आहे. गॅमा निर्देशांक म्हणजे रस्ते वाहतुकीतील मिळालेल्या एकूण शाखांच्या संख्येचे अधिकतम अपेक्षित केंद्रांच्या संख्येसोबत गुणोत्तर आहे.

प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये अमरावती शहरातील बिटा व गॅमा निर्देशांकाचे प्रभागनिहाय अध्ययन करण्यात आलेले आहे.

## उद्दिष्ट्ये

प्रस्तुत संशोधनाची मुख्य उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे,

१) अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या बिटा निर्देशांकाचे अध्ययन करणे.

२) अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या गॅमा निर्देशांकाचे अध्ययन करणे.

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगात आलेली माहिती ही प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतावर व प्रत्यक्ष केलेल्या कामावर आधारित आहे. ही माहिती अमरावती महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा जनगणना पुस्तिका याद्वारे संकलित केलेली आहे.

रस्ते मार्गाची संपर्कता ही ग्राफ थिअरी (Graph Theory) वर आधारित आहे. बिटा निर्देशांक व गॅमा निर्देशांक काढण्यासाठी K- J- Kansky (१९६३) यांनी सांगितलेल्या सूत्राचा अवलंब केलेला आहे.

१) $\beta = e \div v$

२) $\gamma = e \div 3(v - 2)$

$\beta$ - बिटा निर्देशांक,

$\gamma$ - गॅमा निर्देशांक,

$e$ – शाखांची संख्या,

$v$ – केंद्रांची संख्या

सूत्राद्वारे प्राप्त झालेली माहिती ही सारणी मध्ये दर्शविण्यात आलेली असून बिटा निर्देशांक व गॅमा निर्देशांक नकाशामध्ये प्रदर्शित केलेले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगात आलेली माहिती ही २०१८ यावर्षीची आहे.

## अभ्यास प्रदेश

अमरावती शहर हे महाराष्ट्र राज्यातील महत्वाच्या शहरांपैकी एक असून हे शहर राज्याच्या पूर्वेकडे विदर्भात वसलेले आहे.

शहराचा अक्षांश विस्तार हा २०० ५०' १५" उत्तर ते २१० १' ११" उत्तर तर रेखांश विस्तार हा ७७० ४४' ८" पूर्व ते ७७० ५०' ११" पूर्व दरम्यान आहे. शहराचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १२१.८८ चौ.किमी. असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ६४७०५७ एवढी आहे. एकूण लोकसंख्येत ३२९९९२ पुरुष आणि ३१७०६५ स्त्री लोकसंख्या आहे. शहराची लोकसंख्या घनता ५३०९ व्यक्ती प्रती चौ.किमी. आहे.

## बिटा निर्देशांक

अमरावती शहरातील बिटा निर्देशांकाचे एकूण मूल्य हे २.०७ आहे म्हणजेच एकूण शहराचा विचार केला तर मुख्य रस्त्याच्या केंद्रापासून सरासरी हा रस्ते जातात. प्रभागनिहाय याच्या वितरणात असमानता आढळून येते कारण केंद्र व शाखांचे वितरणही असमान आहे.

### अती निम्न बिटा निर्देशांक मूल्य (१.८० पेक्षा कमी)

अभ्यास प्रदेशात जवाहरगेट–बुधवारा (१.२४) आणि महेंद्र कॉलोनी–नवीन कॉटन मार्केट (१.६६) या प्रभागामध्ये ह्या निर्देशांकाचे मूल्य सर्वात कमी आढळून येते. ह्या प्रभागाचे क्षेत्रफळ कमी असून आतील रस्ते अरुंद आहेत. ह्या प्रभागातील मुलभूत परीक्रमांची संख्या देखील कमी आढळून येते.

### निम्न बिटा निर्देशांक मूल्य (१.८० ते २)

शहरातील एकूण आठ प्रभागांमध्ये ह्या संपर्कता निर्देशांकाचे मूल्य १.८० ते २ पर्यंत आढळून येते. यामध्ये अलीम नगर–रेहमत नगर (१.८०), सूतगिरणी (१.८८), फ्रेजरपुरा (१.९०), जमील कॉलोनी (१.९१), गडगडेश्वर (१.९२), नवी वस्ती बडनेरा (१.९६), रुख्मिणी नगर–स्वामी विवेकानंद (२.००) आणि बेनोडा भीमटेकडी–दस्तूर नगर (२.००) यांचा समावेश आहे.

या प्रभागातील रस्ते वाहतूक जाळ्यातील केंद्र व शाखांचे गुणोत्तर कमी असल्याने हे मूल्य कमी आढळून येते. या प्रभागातील रुख्मिणी नगर–स्वामी विवेकानंद या प्रभागातून प्रत्येक रस्त्याच्या केंद्रापासून

सरासरी ह्या रस्ते जातात कारण शाखांची संख्या केंद्रापेक्षा बरोबर दुप्पट आहे. इतर प्रभागातील मुख्य रस्त्यांपासून १ व अधिकतम २ रस्ते जातात.

**सारणी क्रमांक १**

**अमरावती शहर – प्रभागनिहाय रस्ते मार्ग जाळ्यातील बिटा निर्देशांक**

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | बिटा निर्देशांक |
|---|---|---|
| १ | शेगाव-रहाटगाव | २.०३ |
| २ | श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. | २.०७ |
| ३ | नवसारी | २.२४ |
| ४ | [illegible] | १.९९ |
| ५ | [illegible] | १.६६ |
| ६ | विलास नगर-मोरबाग | २.३३ |
| ७ | जवाहर स्टेडियम | २.०४ |
| ८ | जोग स्टेडियम-चपराशीपुरा | २.२८ |
| ९ | एस.आर.पी.एफ.-वडाळी | २.१७ |
| १० | बेनोडा भीमटेकडी-दस्तूर नगर | २.०८ |
| ११ | फ्रेजरपुरा | १.९ |
| १२ | [illegible] | २.०० |
| १३ | अंबापेठ-गोरक्षण | २.१७ |
| १४ | [illegible] | १.७५ |
| १५ | [illegible] | २.७ |
| १६ | [illegible] | १.८ |
| १७ | [illegible] | १.९२ |
| १८ | राजापेठ-श्री संत कवरराम | २.१२ |
| १९ | साई नगर | २.१ |
| २० | [illegible] | १.८८ |
| २१ | जुनी वस्ती बडनेरा | २.१ |
| २२ | नवी वस्ती बडनेरा | १.९६ |
| एकूण | | २.०७ |

**स्त्रोत – संशोधक**




ह्या प्रभागापैकी बेनोडा भीमटेकडी–दस्तूर नगर आणि फ्रेजरपुरा या प्रभागातून एक्सप्रेस मार्ग, जिल्हा मार्ग आणि मुख्य शहरी मार्ग गेलेले आहेत. या प्रभागातील यशोदा नगर चौक, दस्तूर नगर चौक, छत्री तलाव, फरशी स्टॉप, वडरपुरा चौक या परिसरातून मुख्य रस्त्यापासून सरासरी २ ते ३ रस्ते जातात. ह्या प्रभागातून बडनेरा ते पावर हाउस पर्यंत मुख्य रस्ता आणि एक्सप्रेस मार्ग गेलेला आहे. या मार्गांना मुख्य शहरी मार्गाने बऱ्याच ठिकाणी जोडलेले आहे. तसेच दस्तूर नगर व यशोदा नगर चौकातून राष्ट्रीय महामार्गाला मुख्य रस्त्याने संलग्न आहेत त्यामुळे ह्या प्रभागातील बिटा निर्देशांकाचे मूल्य हे इतर प्रभागांच्या तुलनेत अधिक आढळून येते.

**मध्यम बिटा निर्देशांक मूल्य (२ ते २.२०)**

शहरातील आठ प्रभागांमध्ये बिटा निर्देशांकाचे मूल्य २ ते २.२० दरम्यान आढळून येते. यामध्ये शेगाव–रहाटगाव (२.०३), जवाहर स्टेडीयम (२.०४), श्री संत गाडगेबाबा–पी.डी.एम.सी.. (२.०७), साई नगर (ह्रा.घ), जुनी वस्ती बडनेरा (२.१), राजापेठ–श्री संत कवराम (२.१२), एस.आर.पी.एफ.–वडाळी (२.१७), आणि अंबापेठ–गोरक्षण (२.१७) यांचा समावेश आहे.

यातील अंबापेठ–गोरक्षण प्रभागाव्यतिरिक्त इतर प्रभागांचे क्षेत्रफळ अधिक आहे त्यामुळे रस्त्यांचे केंद्र व शाखांची संख्याही अधिक आढळते. यातील अधिकतर प्रभाग हे शहराच्या मध्य भागात आहे तसेच काही प्रभागात मुख्य चौकापासून सरासरी ३ रस्ते जातात. यात राजापेठ चौक, पंचवटी चौक, इर्विन चौक, मध्यवर्ती बस स्थानक, साई नगर चौक, बियाणी चौक यांचा समावेश आहे.

**उच्च बिटा निर्देशांक मूल्य (२.२० ते २.४०)**

अमरावती मध्ये नवसारी (२.२४), जोग स्टेडीयम–चपराशीपुरा (२.२८), विलास नगर–मोरबाग (२.३३), आणि विलास नगर–मोरबाग (२.२३), या प्रभागांमध्ये बिटा निर्देशांकाचे मूल्य हे २.२० ते २.४० पर्यंत आढळते.

ह्यातील विलास नगर–मोरबाग, या प्रभागामध्ये रस्ते जाळ्याच्या मुलभूत परिक्रमा अती निम्न आढळतात तर बिटा निर्देशांकाचे मूल्य हे उच्च आढळते. म्हणजेच ह्या प्रभागातून मुख्य रस्त्यापासून

ह्या रस्ते तर जातात परंतु पुढे जाऊन ते एकमेकांना मिळत नाही. जर प्रभागा अंतर्गत ते परत जोडल्या गेलेत तर मुलभूत परीक्रमांची संख्याही वाढेल.

नवसारी आणि जोग स्टेडीयम परिसरात मुलभूत परिक्रमा व बिटा निर्देशांकाचे मूल्य दोन्ही अधिक आढळून येते कारण केंद्रापासून निघालेले रस्ते पुढे जाऊन परिक्रमा पूर्ण करतात. ह्या प्रभागातील चपराशीपुरा चौक, जोग चौक, कठोरा नाका, नवसारी चौक, या परिसरात मुख्य रस्त्यांच्या केंद्रांपासून सरासरी ३ रस्ते जातात.

अती उच्च बिटा निर्देशांक मूल्य (२.४० पेक्षा अधिक)

अमरावती मधील प्रभाग क्रमांक १५ म्हणजेच छाया नगर—गवळीपुरा या परिसरात बिटा निर्देशांकाचे मूल्य सर्वाधिक आढळून येते. ह्या प्रभागात केंद्र व शाखांची संख्या सर्वात कमी आहे परंतु केंद्र व शाखांचे गुणोत्तर अधिक असल्याने बिटा निर्देशांकाचे मूल्य हे अधिक आढळून येते. या प्रभागात केवळ मुख्य शहरी रस्ते मार्गाचे जाळे आढळून येते तर क्षेत्रफळ कमी असून रस्ते विकासही कमी आढळते परंतु या प्रभागात जे रस्ते एकमेकांना सलंग्न आहेत त्यातून इतर प्रभागाच्या तुलनेत प्रत्येक केंद्रापासून जाणाऱ्या शाखांची सरासरी संख्या इतर प्रभागांच्या तुलनेत थोडी अधिक आढळून येते.

**गॅमा निर्देशांक**

गॅमा निर्देशांक देखील टक्केवारी मध्ये दर्शविता यतो. संपूर्ण शहराचा एकंदरीत विचार केल्यास गॅमा निर्देशांक मूल्य हे ०.६६ आहे म्हणजेच शहराची रस्ते मार्गाची संपर्कता ६६ः पर्यंत आढळून येते.

**अती निम्न गॅमा निर्देशांक मूल्य ('0' मूल्य)**

शहरात छाया नगर—गवळीपुरा या प्रभागाचे गॅमा निर्देशांक मूल्य हे शून्य आढळून येते व या निर्देशांकानुसार संपर्कता ही अतिशय निम्न आहे. या प्रभागात रस्त्यांची लांबी सर्वात कमी असून क्षेत्रही कमी आहे तसेच रस्ते अरुंद असून घरांची रचना जवळ जवळ आहे. तसेच या परिसरात झोपड्यांचे प्रमाणही आढळून येते. या सर्व घटकांचा प्रभाव हा रस्त्यांच्या विकासावर झालेला आढळून येतो.

**निम्न गॅमा निर्देशांक मूल्य (०.७५ पेक्षा कमी)**

शहरातील नवी वस्ती बडनेरा (०.७१), शेगाव—रहाटगाव (०.७२) आणि जवाहर स्टेडीयम (०.७३) या परिसरात गॅमा निर्देशांकाचे मूल्य हे ०.७१ ते ०.७३ यादरम्यान दिसून येते. या तिन्ही प्रभागांचे क्षेत्रफळ अधिक असून रस्ते मार्ग विकसित आहेत परंतु या परिसरातील रस्ते वाहतुकीतील मिळालेल्या एकूण शाखांच्या संख्येचे अपेक्षित केंद्रांच्या संख्येसोबत गुणोत्तर हे इतर प्रभागाच्या तुलनेत कमी आहे. गॅमा निर्देशांकाचे मूल्य ०.७० पेक्षा अधिक असले तरी इतर प्रभागाच्या तुलनेत हे मूल्य कमी असल्याने ह्या प्रभागातील संपर्कता गॅमा निर्देशांकानुसार निम्न असल्याचे आढळून येते.

**सारणी क्रमांक २**

**अमरावती शहर — प्रभागनिहाय रस्ते मार्ग जाळ्यातील गॅमा निर्देशांक (२०१८)**


| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | गॅमा निर्देशांक |
|---|---|---|
| १ | शेगाव-रहाटगाव | ०.७२ |
| २ | श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. | ०.७५ |
| ३ | नवसारी | ०.७९ |
| ४ | जमील कॉलोनी | ०.७८ |
| ५ | महेंद्र कॉलोनी-नवीन कॉटन मार्केट | ०.८३ |
| ६ | विलास नगर-मोरबाग | ०.९३ |
| ७ | जवाहर स्टेडीयम | ०.७३ |
| ८ | जोग स्टेडीयम-चपराशीपुरा | ०.८३ |
| ९ | एस.आर.पी.एफ.-वडाळी | ०.७९ |
| १० | बेनोडा भीमटेकडी-दस्तुर नगर | ०.८३ |
| ११ | फ्रेजरपुरा | ०.७९ |
| १२ | रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद | ०.८३ |
| १३ | अंबापेठ-गोरक्षण | ०.८१ |
| १४ | जवाहरगेट-बुधवारा | ०.८३ |
| १५ | छाया नगर-गवळीपुरा | ० |
| १६ | प्रशांत नगर-हनुमान नगर | ०.७५ |
| १७ | गडगडेश्वर | ०.७६ |
| १८ | राजापेठ-श्री संत कंवरराम | ०.८० |
| १९ | साई नगर | ०.७७ |
| २० | सूतगिरणी | ०.८३ |
| २१ | जुनी वस्ती बडनेरा | ०.७८ |
| २२ | नवी वस्ती बडनेरा | ०.७१ |
| | | |

स्त्रोत — संशोधक

**मध्यम गॅमा निर्देशांक मूल्य (०.७५ ते ०.८०)**

अमरावती मधील अधिकतर क्षेत्रात गॅमा निर्देशांकानुसार रस्ते मार्गाची संपर्कता मध्यम आढळून

येते. शहरातील एकूण ५० प्रभागामध्ये गॅमा निर्देशांकाचे मूल्य हे ०.७५ ते ०.८० पर्यंत आढळते. यात श्री संत गाडगेबाबा–पी.डी.एम.सी.. (०.७५), अलीम नगर–रेहमत नगर (०.७५), गडगडेश्वर (०.७६), साई नगर (०.७७), जमील कॉलोनी (०.७८), जुनी वस्ती बडनेरा (०.७८), नवसारी (०.७९), एस.आर.पी.एफ.–वडाळी (०.७९), फ्रेजरपुरा (०.७९), आणि राजापेठ–श्री संत कवराम (०.८०) यांचा समावेश आहे.




यातील अधिकतर प्रभाग हे शहराच्या पश्चिमेकडे वसलेले असून श्री संत गाडगेबाबा–पी.डी.एम.सी..आणि एस.आर.पी.एफ.–वडाळी हे मोठे प्रभाग शहराच्या पूर्वेकडे आहेत. या निर्देशांकानुसार शहराच्या सीमावर्ती प्रदेशातील संपर्कता मध्यम म्हणजेच ७५ ते ८०% आढळून येते.

**उच्च गॅमा निर्देशांक मूल्य (०.८० ते ०.८५)**

शहराच्या मध्यवर्ती परिसरातील प्रभागांमध्ये गॅमा निर्देशांकाचे मूल्य हे ०.८० ते ०.८५ दरम्यान आढळून येते. यामध्ये अंबापेठ–गोरक्षण (०.८१),महेंद्र कॉलोनी–नवीन कॉटन मार्केट (०.८३),जोग स्टेडीयम–चपराशीपुरा (०.८३), बेनोडा भीमटेकडी–दस्तूर नगर (०.८३), रुख्मिणी नगर–स्वामी विवेकानंद (०.८३), जवाहरगेट–बुधवारा (०.८३), आणि सूतगिरणी (०.८३) या प्रभागांचा समावेश आहे.

हे प्रभाग शहरातील मध्य भागात असून एकमेकास संलग्न असल्याचे आढळते. यातील जवाहरगेट–बुधवारा आणि महेंद्र कॉलोनी–नवीन कॉटन मार्केट या प्रभागात रस्त्यांच्या विकास कमी आहे तसेच केंद्र व शाखांचे प्रमाणही कमी आहे, परंतु अपेक्षित केंद्रांच्या तुलनेत याचे गुणोत्तर अधिक असल्याने हा निर्देशांक उच्च आढळून येतो.

या प्रभागात वस्त्यांची व लोकसंख्येची घनता अधिक असून त्या तुलनेत मात्र ही संपर्कता कमीच आहे.

**अती उच्च गॅमा निर्देशांक मूल्य (०.८५ पेक्षा अधिक)**

अमरावती मधील विलास नगर–मोरबाग (०.९३) या प्रभागामध्ये गॅमा निर्देशांकानुसार रस्ते मार्गांची संपर्कता ही अती उच्च असल्याचे निदर्शनास येते. या प्रभागातून राज्य महामार्ग क्रमांक ६ गेलेला आहे आणि मुख्य शहरी मार्गाद्वारे एकूण ३ ठिकाणी जोडले गेले आहेत. प्रभागाचे क्षेत्रफळ कमी असून त्या तुलनेत रस्ते वाहतुकीतील मिळालेल्या एकूण शाखांच्या संख्येचे अपेक्षित केंद्रांच्या संख्येसोबत गुणोत्तर हे अधिक आहे. त्यामुळे ह्या प्रभागातील संपर्कता गॅमा निर्देशांकानुसार उच्च असल्याचे आढळून येते.

ह्या प्रभागामध्ये रस्ते मार्ग कमी विकसित असले तरी शहराच्या सर्व दिशेने जाण्यासाठी रस्ते एकमेकास जोडलेले आहेत.

**निष्कर्ष व उपाययोजना**

अमरावती शहरातील बिटा निर्देशांकानुसार अधिकतर प्रभागामध्ये रस्ते जाळ्याच्या केंद्रापासून १ ते २ रस्ते जातात तर काही प्रभागातून २ ते ३ रस्ते जातात. शहरातील रस्ते जाळ्यातील मुलभूत परिक्रमा आणि बिटा निर्देशांक यांच्यात थोडी तफावत आढळून येते.

गॅमा निर्देशांकानुसार शहराची एकूण संपर्कता ही ६९% आहे. म्हणजेच शहरातील ३१% भाग अजूनही मुख्य रस्ते एकमेकांना जोडणे आवश्यक आहे.

गॅमा निर्देशांकाचे मूल्य हे छाया नगर–गवळीपुरा हा प्रभाग सोडला तर इतर सर्वच प्रभागामध्ये ०.७० पेक्षा

अधिक आहे. म्हणजेच या निर्देशांकानुसार शहरातील प्रत्येक प्रभागाची संपर्कता ही किमान ७०% पेक्षा अधिक आहे. तर ह्या निर्देशांकाद्वारे रस्ते वाहतुकीतील मिळालेल्या एकूण शाखांच्या संख्येने अपेक्षित केंद्रांच्या संख्येसोबत गुणोत्तर मिळत असल्याने ज्या प्रभागांमध्ये रस्ते मार्ग अधिक विकसित आहे तसेच क्षेत्रफळ अधिक आहे अशा प्रभागात हे मूल्य निम्न किंवा मध्यम आढळते तर रस्ते मार्ग कमी विकसित आणि क्षेत्र कमी असलेल्या प्रभागात हे मूल्य उच्च आढळून येते.

शेगाव–रहाटगाव प्रभाग शहराच्या उत्तरेकडे असून या प्रभागातून एक्स्प्रेस मार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व जिल्हा मार्ग गेलेला आहे तसेच मुख्य शहरी मार्गाद्वारे हे एकमेकांना जोडलेले आहेत प्रभागाचे क्षेत्रफळ अधिक असल्याने मुख्य रस्ते एकमेकास जोडून त्यातील संपर्कता अधिक वाढवता येऊ शकते.

या निर्देशांकानुसार ज्या प्रभागातील रस्ते मार्गाची संपर्कता कमी आहे अशा प्रदेशातील अंतर्गत मुख्य रस्ते एकमेकास जोडून संपर्कता वाढविणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे वेळ व अंतर कमी होऊन इंधनाचीही बचत होईल व त्यामुळे शहराचा संतुलित विकास होण्यास मदत मिळेल.

## संदर्भ सूची

१. अंबोरे दिपक (२०२०), ''अमरावती शहरातील रस्ते वाहतूक जाळे, सुगमता व संपर्कतेचा शहराच्या विकासावर प्रभाव भौगोलिक अध्ययन'', शोध प्रबंध, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२. Deshpande Dr- S- S- 2007 "Road Connectivity and Road Development in Vidarbha Maharashtra State"- The Deccan Geographer Vol-45 No- 71- The Deccan Geography Society Pune] Page No- ३७, ३९–४२.

३. Kansky K- J- 1963 "Structure of Transportation Network Relationship between Network and Regional Characteristics Research Paper No- 84 Depart of Geography University of Chicago Pp- १–१५५.

४. Raza M- and Aggrawal Y- 1986 Transport Geography of India Concept New Delhi

5. TDM Encyclopedia 2017 Roadway Connectivity & Creating More Connected Roadway and Pathway Networks Victoria Transport Policy Institute 2 January 2017

**17**

# लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्याचा अनुबंध

**डॉ. अतुल सुरेश पाटील**
मराठी विभाग,
मू. जे. महाविद्यालय, जळगाव

समाज जसा प्रवाही असतो त्याचप्रकारे त्या समाजातून निर्माण झालेले साहित्य हे सुद्धा प्रवाही आणि प्रभावी असते. कारण साहित्य शेवटी मानवी मनाचं, जीवनाचं आणि समाजाचं प्रतिबिंब असतं. एखाद्या प्रादेशिक भूमीत भौगोलिक विविधता असते. त्यात डोंगर नद्या, नाले, पावसाचे प्रमाण, विशिष्ट पीक, विशिष्ट सण, उत्सव यामुळे त्या प्रदेशाला वेगळेपण असतं. त्याचा परिणाम म्हणून मानवी समाजजीवनावर तेथील स्वभावशिष्ट्यांसह वेगवेगळा परिणाम होत असतो. हाच परिणाम साहित्यात काही प्रमाणात लेखनाच्या माध्यमातून साकार झालेला दिसतो. याच समाजजीवनाचा आरसा हा लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य या साहित्य प्रकारांमधलं लेखन आहे असे म्हणता येईल. कारण शेवटी लेखक हा ही समाजातलाच एक घटक आहे. समाजातल्या वेगवेगळ्या घटनांचा प्रभाव त्याच्यावरही आहे. हे विविध लेखकांच्या लेखनशैलीवरून समजते. म्हणून एखादा लेखक त्याच्या लेखनातून सामाजिक रूढ्यपरंपरांच्या पाऊलखुणा असणाऱ्या साहित्यकृती निर्माण करत असेल तर, त्यात लोकसाहित्याचे आणि ग्रामीण साहित्याचे संदर्भ आल्याशिवाय राहत नाही हेही मान्य करावे लागेल. म्हणून ग्रामीण आणि लोकसाहित्य यांचा संयुक्तिक अभ्यास करणे, त्यातले अनुबंध शोधणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्य म्हणजे जीवनातल्या दैनंदिन व्यवहाराचे स्वरूप आहे. लोकसाहित्याचा अविष्कार लोकजीवनामध्ये वेगवेगळ्या रूपांनी साकार होतो. म्हणून लोकसाहित्य आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा

Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## April - 2023

ISSUE No - (CDVII) 407





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor - (SJIF) -8.632 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## April -2023

ISSUE No - (CDVII) 407

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Executive-Editors
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 21 | प्राचीन काळातील बारव : कला व स्थापत्य : एक ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. डॉ. भोसले मृणाल गुलाबराव | 95 |
| 22 | भारतीय निवडणूक व्यवस्थेमधील दोष व त्यावरील उपायांचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>कु.स्वाती युगेद्र अंबळकार , डॉ.संगीता भांगडिया (मालाणी) | 98 |
| 23 | साठोत्तरी मराठी काव्यविचार : एक दृष्टीक्षेप १९६० ते १९९०<br>डॉ. आर. बी साखरकर | 104 |
| 24 | अमरावती शहरातील अंतरानुसार रस्ते मार्गाच्या सुगमतेचे भौगोलिक अध्ययन<br>प्रा. दिपक उदयराज अंबोरे | 112 |
| 25 | लोकशाहीतील प्रसार माध्यमांची बदलती भूमिका डॉ.संगीता भांगडिया मालानी | 117 |
| 26 | सातवाहनाचे महाराष्ट्रातील राजकीय, आर्थिक व सांस्कृतीक योगदान –<br>प्रा.डॉ. बोचरे जे. एम. | 124 |
| 27 | कोकणातील 'दशावतार' : मराठी नाटयसृष्टीची गौरवशाली परंपरा<br>प्रा. डॉ. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 127 |
| 28 | स्त्रिया आणि माध्यमे डॉ. सुवर्णा देविदासराव जवंजाळ | 131 |
| 29 | वातविकाराची कारणे व त्यावरील उपाय प्रा. डॉ. विद्या मुकुंद ठवकर | 134 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

# अमरावती शहरातील अंतरानुसार रस्ते मार्गाच्या सुगमतेचे भौगोलिक अध्ययन

प्रा. दिपक उदयराज अंबोरे
भूगोल विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती
मोबाईल क्र – ९७३०१९८६७८, इमेल – deepakambore710@gmail.com

सारांश

प्रदेशाच्या विकासासाठी रस्ते मार्ग विकसित असणे आवश्यक असते कारण रस्ते हे दळणवळणाचे प्रमुख स्त्रोत आहे. देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक विकासात रस्ते मार्गाची महत्वाची भूमिका आहे. साधारणतः मुख्य रस्त्यापासुनचे अगदी जवळ असणारे व लवकरात लवकर पोहोचता येईल असे क्षेत्र हे उच्च सुगमतेचे असते. उच्च सुगमता क्षेत्रात व्यापार क्षेत्र विकसित झालेले आढळते.

अमरावती शहराच्या विकासात रस्ते मार्गाचे महत्वाचे योगदान आहे. अमरावती शहर हे प्राचीन शहर असून रस्ते मार्गाची प्रगती वेळोवेळी होत गेलेली आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात अमरावती शहरातील मुख्य रस्त्यांच्या अंतरानुसार असलेल्या सुगमतेचे अध्ययन प्रभागनिहाय करण्यात आलेले आहे.

बीजसंज्ञा

रस्ते मार्ग, सुगमता, अंतर, उच्च, मध्यम, निम्न

## प्रस्तावना

सुगमता ही प्रामुख्याने वेळ आणि अंतर यावर अवलंबून असते. एखाद्या ठिकाणावरून मुख्य रस्त्यापर्यंत पोहोचण्यासाठीचे अंतर आणि वेळ यावर त्या प्रदेशाची सुगमता अवलंबून असते. मुख्य रस्त्यांच्या अगदी जवळचे क्षेत्र हे उच्च सुगम असते तर जसजसे मुख्य रस्त्यापासूनचे अंतर वाढत जाते तसतशी सुगमता कमी होत जात असते.

प्रस्तुत संशोधनात अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या सुगमतेचे प्रभागनिहाय तुलनात्मक अध्ययन करण्यात आलेले आहे.

## उद्दिष्ट्ये

प्रस्तुत अभ्यासाची मुख्य उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे,

१) अमरावती शहरातील मुख्य रस्ते मार्गाची अंतरानुसार सुगमता क्षेत्र काढणे

२) अमरावती शहरातील रस्ते मार्गाच्या अंतरानुसार सुगमतेचे प्रभागनिहाय तुलनात्मक अध्ययन करणे.

## माहिती स्त्रोत व अभ्यास पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगात आणलेली माहिती ही द्वितीय स्त्रोतावर आणि स्वताः केलेल्या प्रत्यक्ष कामावर आधारित आहे. रस्ते मार्गाचा मुळ नकाशा हा अमरावती महानगर पालिकाकडून संकलित केलेला असून तो जी. आय. एस. द्वारे काढण्यात आलेला आहे.

जी. आय. एस. संगणकाद्वारे मुख्य रस्त्यापासून विशिष्ट अंतराचे क्षेत्र काढून सुगमता प्रदेश निश्चित आकरण्यात आलेले आहे. प्रभानिहाय सुगमतेनुसार क्षेत्रफळ हे सारणी मध्ये दर्शविले असून सुगमता क्षेत्र हे नकाशामध्ये दर्शविलेले आहे. तसेच शहरातील एकूण सुगमता क्षेत्राचे वितरण स्तंभालेखाद्वारे दर्शविण्यात आलेली आहे.

## अभ्यास प्रदेश

अमरावती शहर हे महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेकडे असून हे शहर अमरावती जिल्हा व विभागाचे मुख्य ठिकाण आहे. अमरावती शहराचे स्थान देशाच्या जवळपास केंद्रस्थानी आहे.

अमरावती शहराचा अक्षवृत्तीय विस्तार २०° ५०′ १५″ उत्तर ते २१° १′ ११″ उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७७° ४४′ ८″ पूर्व ते ७७° ५०′ ११″ पूर्व आहे. अमरावती शहराचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १२१.८८ चौ.किमी. असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ६४७०५७ एवढी आहे. एकूण लोकसंख्येत ३२९९९२ पुरुष आणि ३१७०६५ स्त्री लोकसंख्या आहे. शहराची लोकसंख्या घनता ५३०९ व्यक्ती प्रती चौ.किमी. आहे.

## अमरावती शहरातील रस्ते मार्ग

अमरावती शहरातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ गेलेला असून तो पश्चिमेकडे धुळे तर पूर्वेकडे कोलकाताकडे जातो. अमरावती शहरापासून जिल्ह्यातील सर्व तालुके हे राज्य महामार्गांनी जोडलेले आहे.

अमरावती शहरातील मुख्य रस्त्यांची एकूण लांबी २६८.३ किमी असून सर्वाधिक रस्ते मार्गाची लांबी ही जुनी व नवी वस्ती बडनेरा, संत गाडगे बाबा- पी.डी.एम.सी. परिसर व शेगाव-रहाटगाव या प्रभागात आढळते कारण या प्रभागांचे क्षेत्रफळ मोठे आहे

अमरावती शहरात बस, रेल्वे सेवा उपलब्ध असून शहरातील अंतर्गत भागातील वाहतुकीसाठी शहर बससेची सेवा उपलब्ध आहे.

**अमरावती शहरातील रस्ते मार्गाची अंतरानुसार सुगमता**

प्रस्तुत अभ्यास क्षेत्र हे एक शहर असल्याने ते लघु क्षेत्र आहे आणि अशा क्षेत्रात साधारणता मुख्य रस्त्यापासून २०० मीटर पर्यंतचे क्षेत्र हे अति उच्च सुगम समजल्या जाते तर त्यापुढे अंतर वाढत गेल्यास सुगमता कमी होत जाते. अमरावती शहरातील रस्ते मार्गाची सुगमता काढण्यासाठी मुख्य रस्त्यापासून २०० मीटर पर्यंतचे अंतर हे अति उच्च सुगमता क्षेत्र, २०० ते ४०० मीटर पर्यंतचे अंतर हे उच्च सुगमता क्षेत्र, ४०० ते ६०० मीटर पर्यंतचे अंतर हे मध्यम सुगमता क्षेत्र, ६०० ते ८०० मीटर पर्यंतचे अंतर हे निम्न सुगमता क्षेत्र आणि ८०० मीटर पेक्षा अधिक अंतर असलेले क्षेत्र हे अति निम्न सुगमता क्षेत्र असे विश्लेषण केलेले आहे.

संपूर्ण अमरावती शहराचा विचार केल्यास एकूण ८३.७२ चौकिमी क्षेत्र (६८.६९%) हे अती उच्च सुगमतेचे असून २३.७७ चौकिमी क्षेत्र (१९.५०%) हे उच्च सुगमता क्षेत्रामध्ये येते. शहरातील जवळपास ८८% क्षेत्र हे रस्त्यांच्या सुगम प्रदेशात येते. मध्यम सुगमता क्षेत्र ७.७८ चौकिमी (६.३८%) असून निम्न सुगमता क्षेत्र ४.५४ चौकिमी (३.७२%) आणि अति निम्न सुगमता क्षेत्र २.०७ चौकिमी (१.७०%) आढळून येते. निम्न सुगमता क्षेत्र हे प्रामुख्याने शहराच्या सीमावर्ती भागातील असल्याचे निदर्शनास येते (आलेख क्रमांक १).


**सारणी क्रमांक १**

**अमरावती शहर – प्रभागनिहाय रस्ते मार्गाची अंतरानुसार सुगमता क्षेत्र (२०१८)**

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | (० ते २०० मीटर अति उच्च सुगमता क्षेत्र | (२०० ते ४०० मीटर) उच्च सुगमता क्षेत्र | (४०० ते ६०० मीटर) मध्यम सुगमता क्षेत्र | (६०० ते ८०० मीटर) निम्न सुगमता क्षेत्र | (८०० मीटर पेक्षा अधिक) अति निम्न सुगमता क्षेत्र | एकूण क्षेत्राफळ (चौकिमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेगाव-रहाटगाव | ७.४२ | २.६७ | ०.७२ | ०.४८ | ० | ११.२९ |
| २ | श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. | ७.५३ | २.५३ | ०.८ | ०.५५ | ० | ११.४१ |
| ३ | नवसारी | ५.८५ | २.६५ | १.०८ | ०.७६ | ०.०३ | १०.३७ |
| ४ | जमील कॉलोनी | २.३२ | ०.५८ | ० | ० | ० | २.९ |
| ५ | महेंद्र कॉलोनी-नवीन कॉटन मार्केट | १.४७ | ०.७१ | ० | ० | ० | २.१८ |
| ६ | विलास नगर-मोरबाग | १.७९ | ०.३८ | ० | ० | ० | २.१७ |
| ७ | जवाहर स्टेडीयम | ३.४७ | ०.१५ | ० | ० | ० | ३.६२ |
| ८ | जोग स्टेडीयम-चपराशीपुरा | ३.०६ | ०.११ | ० | ० | ० | ३.१७ |
| ९ | एस.आर.पी.एफ.-वडाळी | ७.९७ | ३.८४ | २.६२ | १.४६ | १.७६ | १७.६५ |
| १० | बेनोडा भीमटेकडी-दस्तूर नगर | २.५५ | ०.२८ | ० | ० | ० | २.८३ |
| ११ | फ्रेजरपुरा | १.६४ | ०.०८ | ० | ० | ० | १.७२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद | १.७९ | ० | ० | ० | ० | १.७९ |
| १३ | अंबापेठ-गोरक्षण | २.७७ | ०.०१ | ० | ० | ० | २.७८ |
| १४ | जवाहरगेट-बुधवारा | १.५ | ०.०१ | ० | ० | ० | १.५१ |
| १५ | छाया नगर-गवळीपुरा | १.४८ | ०.१६ | ० | ० | ० | १.६४ |
| १६ | अलीम नगर-रेहमत नगर | १.५३ | ०.०९ | ० | ० | ० | १.६२ |
| १७ | गडगडेश्वर | ३.८२ | १.८२ | ०.६४ | ०.३७ | ०.२८ | ६.९३ |
| १८ | राजापेठ-श्री संत कवराम | २.३३ | ०.०९ | ० | ० | ० | २.४२ |
| १९ | साई नगर | ६.२६ | १.७४ | ०.३ | ० | ० | ८.३ |
| २० | सूतगिरणी | २.०१ | ०.७१ | ० | ० | ० | २.७२ |
| २१ | जुनी वस्ती बडनेरा | ७.६९ | २.७८ | ०.५ | ०.३७ | ० | ११.३४ |
| २२ | नवी वस्ती बडनेरा | ७.४७ | २.३८ | १.१२ | ०.५५ | ० | ११.५२ |
| | एकूण | ८३.७२ | २३.७७ | ७.७८ | ४.५४ | २.०७ | १२१.८८ |

स्रोत – संशोधक




(आलेख क्रमांक १)

**अति उच्च सुगमता क्षेत्र (० ते २०० मीटरपर्यंत अंतर)**

शहरातल्या प्रत्येक प्रभागात रस्त्यांचा कमी-अधिक प्रमाणात विकास झालेला आहे. त्यामुळे सर्वच प्रभागात अति उच्च सुगमता क्षेत्र आढळून येते. एस.आर.पी.एफ.-वडाळी (७.९७ चौकिमी), जुनी वस्ती बडनेरा (७.६९ चौकिमी), श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. (७.५३ चौकिमी), नवी वस्ती बडनेरा (७.४७ चौकिमी), शेगाव-रहाटगाव (७.४२ चौकिमी), साईनगर (६.२६ चौकिमी) आणि नवसारी (५.८५ चौकिमी) या प्रभागांचे ५ चौकिमी पेक्षा अधिक क्षेत्र हे अति उच्च सुगमतेचे दिसते. इतर प्रभागातील १ ते ४ चौकिमी पर्यंतचे क्षेत्र हे उच्च सुगमतेचे आढळते

**उच्च सुगमता क्षेत्र (२०० ते ४०० मीटरपर्यंत अंतर)**

मुख्य रस्त्यांपासून २०० ते ४०० मीटर पर्यंतचे अंतर असलेले क्षेत्र हे उच्च सुगमता प्रदेशात येते. या सुगमता क्षेत्रात एस.आर.पी.एफ.-वडाळी (३.८४ चौकिमी) या प्रभागाचे सर्वाधिक क्षेत्र आढळते तर इतर प्रभागाचे क्षेत्र हे ३ चौकिमी पेक्षा कमी आढळून येते.

शहराच्या मध्यवर्ती असलेल्या सर्व प्रभागांचे क्षेत्र हे अति उच्च व उच्च सुगमता क्षेत्रात येते. तर ज्या प्रभागांचे ? चौकिमी पेक्षा कमी क्षेत्र हे उच्च सुगमतेचे आहे अशा प्रभागांचे उर्वरित क्षेत्र हे अति उच्च सुगमता मध्ये येते. अमरावती शहरातील सर्व प्रभागांचे ६५% पेक्षा अधीक क्षेत्र हे मुख्य रस्त्यांच्या ० ते ४०० मीटर पर्यंत अंतर प्रदेशात येते.

**मध्यम सुगमता क्षेत्र (४०० ते ६०० मीटर पर्यंत अंतर)**

शहरातील एकूण आठ प्रभागांमध्ये मध्यम सुगमता क्षेत्र आढळून येते तर इतर सर्व प्रभागामधील क्षेत्र उच्च व अती उच्च सुगमता क्षेत्रात येत असल्याने मध्यम सुगमता क्षेत्र आढळत नाही.

या आठ प्रभागामध्ये एस.आर.पी.एफ.-वडाळी (२.६२ चौकिमी), नवी वस्ती बडनेरा (१.१२ चौकिमी), नवसारी (१.०८ चौकिमी), श्री संत गाडगेबाबा-पी.डी.एम.सी. (०.८ चौकिमी), शेगाव- रहाटगाव (०.७२ चौकिमी), गडगडेश्वर (०.६४ चौकिमी), जुनी वस्ती बडनेरा (०.५ चौकिमी) आणि साई नगर (०.३ चौकिमी) यांचा समावेश आहे. या आठही प्रभागांचे क्षेत्रफळ अधिक असल्याने मुख्य रस्त्यांचे जाळे असूनही काही भाग हा मध्यम सुगमता क्षेत्रात आढळतो.

**निम्न सुगमता क्षेत्र (६०० ते ८०० मीटर पर्यंत अंतर)**

मध्यम सुगमता क्षेत्रातील साईनगर हा प्रभाग सोडून इतर सात प्रभागांमध्ये निम्न सुगमता क्षेत्र आढळून येते (सारणी क्रमांक १). एस.आर.पी.एफ.-वडाळी हा प्रभाग क्षेत्रफळाने सर्वात मोठा असल्याने या प्रभागाचे १.४६ चौकिमी (८.२७%) क्षेत्र हे निम्न सुगमतेचे आहे तर इतर प्रभागांचे ३ ते ८% भौगोलिक क्षेत्र निम्न सुगमता प्रदेशात दिसून येते.



अती निम्न सुगमता क्षेत्र (६०० ते ८०० मीटर पर्यंत अंतर)

अभ्यास प्रदेशात एस.आर.पी.एफ.-वडाळी (१.७६ चौकिमी), गडगडेश्वर (०.२८ चौकिमी) आणि नवसारी (०.०३ चौकिमी) प्रभागात अति निम्न सुगमता क्षेत्र आढळून येते. हे तिन्ही प्रभाग क्षेत्रफळाने मोठे असून या प्रभागाच्या व शहराच्या सीमावर्ती प्रदेशात हे निम्न सुगमतेचे क्षेत्र आढळते (नकाशा क्रमांक १).

एस.आर.पी.एफ.-वडाळी या प्रभागाच्या पूर्वेस चांदूर रेल्वे-वर्धे कडे राज्य महामार्ग जातो परंतु या प्रभागाच्या आतील बाजूस मुख्य रस्त्यांचे जाळे क्षेत्रफळाच्या तुलनेत कमी विकसित असल्याने काही प्रदेश निम्न सुगमता क्षेत्रात आढळतो.

निष्कर्ष व उपाययोजना

शहरातील रुक्मिणी नगर-स्वामी विवेकानंद (प्रभाग क्रमांक १२) चे संपूर्ण १००% क्षेत्र हे अति उच्च सुगमतेचे आहे. हा प्रभाग शहराच्या मध्यवर्ती भागात असून क्षेत्रफळाने लहान आहे तसेच क्षेत्रफळाच्या तुलनेत रस्त्यांचा विकास झालेला असल्याने या प्रभागातील संपूर्ण क्षेत्र हे मुख्य रस्त्यांच्या २०० मीटर पर्यंतच्या अंतरातच आढळून येते.

तसेच शहरातील ज्या प्रभागांचे क्षेत्रफळ लहान व रस्त्यांची घनता अधिक आहे अशा प्रभागात अति उच्च सुगमता क्षेत्र ९०% पेक्षा अधिक आढळते.

गडगडेश्वर प्रभागात पश्चिमेकडे मुख्य रस्त्यांचे जाळे विरळ आहे, त्यामुळे या पश्चिम सिमावर्ती क्षेत्रात रस्त्यांची सुगमता अतिशय निम्न असल्याचे दिसून येते.

नवसारी प्रभागामध्ये रस्त्याचे जाळे विकसित आहेत परंतु एकदम आतील बाजूस मुख्य रस्ते नसल्यामुळे या प्रभागातील काही क्षेत्र हे निम्न सुगमतेत आढळते.

शहराच्या सीमावर्ती प्रदेशात मुख्य रस्ते जाळे कमी विकसित असल्याने या प्रदेशातील सुगमता शहरातील केंद्रीय प्रदेशापेक्षा थोडी कमी आढळून येते. त्यामुळे अशा प्रदेशात मुख्य रस्ते जाळे विकसित करणे आवश्यक आहे. तसेच शहरातील लोकसंख्या व त्या भागातील क्षेत्रफळ आणि वाहतुकीची वर्दळ यांचा विचार करून मुख्य रस्ते जाळे विकसित करणे आवश्यक आहे. नवसारीच्या आतील बाजूस, गडगडेश्वर प्रभागात पश्चिमेकडे, वडाळीच्या दक्षिणेकडे मुख्य रस्ते जाळे वाढविणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील सर्व प्रदेशातील सुगमता वाढून विकासास गती मिळेल.

संदर्भ सूची

१ अंबोरे दिपक (२०२०), "अमरावती शहरातील रस्ते वाहतूक जाळे, सुगमता व संपर्कतेचा शहराच्या विकासावर प्रभाव : भौगोलिक अध्ययन", पीएच.डी. संशोधन आराखडा, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२ Halden D., Jones P., Wixey S. (2005), "Accessibility Analysis Literature Review.", Transport Study Groups, University of Webmaster, Page No.2

३ Rani Dr Subodh (2018), "Road Density and Regional Development in Haryana- 2011", Global Journal for Research Analysis, Volume-7, Issue-3, March-2018, Page No 57.

Suchit Kumar Rai, Sunil Kumar, Arvind Kumar Rai, Satyapriya and Dana Ram Palsaniya 2014 Climate Change Variability and Rainfall Probability for Crop Planning in Few Districts of Central India. Atmos. Climate Sci. 4 394-403.